# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले अधिवेशन, २०१५

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**गुरुवार, दिनांक २६ मार्च, २०१५ / चैत्र ५, १९३७ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **शालेय शिक्षण,क्रिडा आणि युवक कल्याण, उच्च व तंत्रशिक्षण, वैद्यकीय शिक्षण, मराठी भाषा, सांस्कृतिक कार्य मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२)** | **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण, अन्न आणि औषध प्रशासन, संसदीय कार्य मंत्री** | |
| **(३)** | **पर्यावरण मंत्री** | |
| **(४)** | **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ६२**

---

### राज्यात अप्रशिक्षित शिक्षकांना सेवानिवृत्ती वेतन लागू करण्याबाबत

**(१) * ३२७३ श्री.रामनाथ मोते, श्री.नागो गाणार, डॉ.अपूर्व हिरे : तारांकित प्रश्न क्रमांक ३१३२४ ला दिनांक २४ जुलै, २०१२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिनांक १ जुलै, १९७२ रोजी अथवा त्यानंतर सेवेत आलेल्या अप्रशिक्षित प्राथमिक शिक्षकांना सेवानिवृत्ती वेतन योजना लागू केली जात नाही, हे खरे आहे काय,

(२) जुलै, २०१२ च्या अधिवेशनात उपस्थित केलेल्या तारांकित प्रश्नास उत्तर देतांना मा.सभापती यांनी दिलेल्या निर्देशानुसार कार्यवाही करण्यात येईल असे आश्वासन शासनाच्या वतीने देण्यात देण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सेवानिवृत्त झालेल्या अप्रशिक्षित प्राथमिक शिक्षकांना सेवानिवृत्ती वेतन देण्याबाबत अद्याप कार्यवाही न करण्याची कारणे काय आहेत?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय.

(२) होय.

(३) प्रस्ताव शासन स्तरावर अमान्य करण्यात आलेला आहे.

-----------------

**राज्यात माध्यमिक आणि उच्च माध्यमिक विभागातील वाढीव पदांना मान्यता देण्याबाबत**

**(२) * २८८६ डॉ.सुधीर तांबे, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माध्यमिक आणि उच्च माध्यमिक विभागात पायाभूत पदांपेक्षा वाढीव पदे निर्माण होत असतात या पदांना त्याच वर्षात मान्यता देण्याविषयी शासन निर्णय आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अशा पदांना शासन तातडीने मान्यता देत नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, यापुढील काळात त्याच वर्षात मान्यता व अनुदान देण्याबाबत शासन काय कार्यवाही करणार आहे,

(४) नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२), (३) व (४) माध्यमिक व उच्च माध्यिमक विभागात पायाभूत पदांपेक्षा वाढीव पदांना मान्यता देण्याबाबत शासन निर्णय दिनांक २२.३.२०१३ अन्वये कार्यवाही करण्यात येते.

-----------------

**राज्यातील कनिष्ठ महाविद्यालयांना सुधारित वेतनश्रेणी देण्याबाबत**

**(३) * ३७५३ श्री.विक्रम काळे, श्री.हेमंत टकले, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.सतिश चव्हाण, डॉ.सुधीर तांबे, श्री.अनिल भोसले, श्री.ख्वाजा बेग, श्री.अमरसिंह पंडित, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तंत्रशिक्षण विभागातील एमसीव्हिसी कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांना शालेय शिक्षण विभागातील कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांप्रमाणे पाचव्या वेतन आयोगाची वेतनश्रेणी दिनांक १ जानेवारी १९९६ पासून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(२) असल्यास, त्याबाबत शासन आदेश निर्गमित केला आहे काय,

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, होणाऱ्या विलंबाची सविस्तर कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) सदरहू प्रस्ताव वित्त विभागाने नामंजूर केला आहे.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**यवतमाळ जिल्ह्यातील शाळांमध्ये निकृष्ट प्रतीचा आहार दिला जात असल्याबाबत**

**(४) * ३४५२ श्री.संदिप बाजोरिया, श्री.किरण पावसकर, श्री.सतिश चव्हाण, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.ख्वाजा बेग, श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्ह्यातील कोरटा केंद्रांतर्गत येणाऱ्या शाळांमध्ये निकृष्ट प्रतीचा आहार दिला जात असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१४ च्या तिसऱ्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार निकृष्ट दर्जाचा आहार देणाऱ्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) अशा स्वरुपाची बातमी वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द झालेली होती.

(२) व (३) सदर बातमीच्या अनुषंगाने चौकशी केली असता शाळांमध्ये शालेय पोषण आहार शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार देण्यात येत असून आहाराचा दर्जा चांगला असल्याचे आढळून आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**केंद्र शासनाद्वारे अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना JEE/AIPMT या परीक्षेच्या पूर्वतयारी करीता नि:शुल्क व्यवस्था करणाऱ्या संस्थांना देण्यात येणा-या शिष्यवृत्ती किंवा अनुदानाबाबत**

**(५) * २६७४ श्री.अनिल सोले, श्री.नागो गाणार :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाद्वारे अल्पसंख्याक विद्यार्थ्यांच्या "Free Coaching & Allied Scheme" for JEE/AIPMT या स्कीम अंतर्गत परीक्षेच्या पूर्वतयारी करीता नि:शुल्क व्यवस्था करणाऱ्या संस्थांना शिष्यवृत्ती किंवा अनुदान दिले जाते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जनविकास बहु. शिक्षण संस्था कृषी व ग्रामीण विकास संस्था, अमरावती या संस्थेद्वारा नागपूर येथील अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसाठी वरील योजनेअंतर्गत परीक्षेच्या पूर्वतयारीकरीता नि:शुल्क व्यवस्था करण्यात आली होती व त्यासाठी या संस्थेला सन २०१२-१३ मध्ये केंद्र शासनाद्वारे अनुदानाचा हप्ता देण्यात आला होता, हे ही खरे आहे काय,

(३) परंतू सन २०१३-१४ सत्रातील विद्यार्थ्यांसाठी अनुदानाचा दुसरा हप्ता देण्यासाठी राज्य शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण मंत्रालयामार्फत संस्थेचा तपासणी अहवाल केंद्र शासनाकडे सादर करण्याची अट घालण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार उच्च व तंत्र शिक्षण विभागामार्फत नागपूर येथील तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयामार्फत सदरहू संस्थेची तपासणी करुन व त्रुटींची पुर्तता करुन तंत्रशिक्षण विभागाने सदरहू अहवाल राज्य शासनाच्या मंत्रालय विभागात माहे मे, २०१३ मध्ये सादर केला होता व सदरहू अहवाल आजपावेतो केंद्र शासनाकडे पाठविण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, नागपूर विभागाच्या जनप्रतिनिधींनी मा.मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण मंत्रालय, मुंबई यांना दिनांक २१ जानेवारी, २०१५ रोजी पत्र पाठवून सदरहू अहवाल तात्काळ केंद्र शासनाच्या मंत्रालयीन विभागाकडे सादर करण्याची विनंती केली, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे?

**श्री. विनोद तावडे :** (१) अंशतः खरे आहे.

सदर योजना केंद्र शासनाची असून केंद्र शासनाकडून जाहिरात देऊन या योजनांतर्गत येणारे कोर्सेस चालविणा-या संस्थांकडून प्राप्त प्रस्ताव, केंद्र शासनाकडून मंजूर झाल्यानंतर, मंजूर अनुदान दोन हप्त्यांमध्ये संबंधित संस्थेस देण्यात येते.

(२) अंशतः खरे आहे.

जनविकास बहु.शिक्षण संस्था कृषि व ग्रामीण विकास या संस्थेचा सन २०१२-१३ साठी उपरोक्त योजनेंतर्गत प्राप्त नवीन प्रस्ताव तपासणी करुन तपासणी अहवालांसह राज्य शासनामार्फत केंद्र शासनाकडे पाठविण्यात आला होता. केंद्र शासनाकडून ४० विद्यार्थ्यांना PMT/AIEEE अभ्यासक्रमांसाठी मोफत प्रशिक्षण देण्यासाठी अनुदानाचा पहिला हप्ता केंद्रशासनाचे दिनांक ११.०३.२०१३ आदेशान्वये संस्थेस थेट मंजूर केला आहे.

(३) नाही.

केंद्र शासनाच्या उपरोक्त योजनेंतर्गत संस्थेस एकूण मंजूर अनुदानाचा पहिला हप्ता प्राप्त झाल्यानंतर, उर्वरित दुस-या हप्त्यासाठी प्राप्त प्रस्ताव तपासणी अहवाल (Part III) व सुस्पष्ट शिफारस (Part IV) यांसह केंद्र शासनास पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्याची विहित कार्यपद्धती केंद्रशासनाने ठरवून दिली आहे.

(४), (५) व (६) नाही.

केंद्रशासनाच्या या योजनेबाबत केंद्र शासनाच्या निर्देशानुसार राज्य शासनामार्फत कार्यवाही करण्यात येते.सदर संस्थेस अनुदानाचा पहिला हप्ता प्राप्त झाल्यानंतर दुस-या हप्त्यासाठी संस्थेने सादर केलेला प्रस्ताव, तपासणी अहवाल (Part III) व त्यानुषंगाने सुस्पष्ट शिफारस (part IV) दिनांक २४.२.२०१५ च्या शासन पत्रान्वये विहित पद्धतीने केंद्र शासनास पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात आला आहे.

-----------------

**खामगांव (जि.बुलढाणा) येथील शासकीय तंत्रनिकेतन मधील**
**अधिव्याख्यातांची रिक्त असलेली पदे**

**(६) * ४०५८ श्री.पांडुरंग फुंडकर :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खामगांव, (जि.बुलढाणा) येथील शासकीय तंत्रनिकेतन येथे अधिव्याख्यातांची बरीच पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त अधिव्याख्यातांची पदे रिक्त असल्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये याकरिता रिक्त असलेल्या अधिव्याख्यातांची पदे भरणेबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) अंशतः खरे आहे.
(२) हे खरे नाही. कारण पर्यायी व्यवस्था केली आहे.

शासकीय तंत्रनिकेतन, खामगाव या संस्थेतील रिक्त २५ पदांपैकी १० पदांची कंत्राटी अधिव्याखात्यांची नेमणूक केलेली आहे. तसेच विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून तासिका तत्वावर अध्यापकांची नेमणूक करुन अभ्यासक्रम पुर्ण करुन घेण्यात येतो.
(३) शासकीय तंत्रनिकेतनातील अधिव्याख्याता ही पदे राज्यस्तरीय असल्याने सर्व शासकीय तंत्रनिकेतनातील रिक्त असलेल्या अधिव्याख्याता या पदाचा वेळोवेळी आढावा घेण्यात येतो.
(४) महाराष्ट्रातील शासकीय तंत्रनिकेतनातील अधिव्याख्यात्यांची रिक्त पदे भरण्याकरीता महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे मागणीपत्र सादर केले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पुणे विद्यापीठाचे विभाजन करुन नाशिक येथे नवीन स्वतंत्र विद्यापीठ स्थापन करण्याबाबत**

**(७) * २८२३ डॉ.अपूर्व हिरे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.अनिल भोसले, श्री.ख्वाजा बेग : तारांकित प्रश्न क्रमांक ४९१५२ ला दिनांक १४ जून, २०१४ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे विद्यापीठाच्या परिक्षा विभाग व प्रशासकीय व्यवस्थेवरील कामाचा ताण कमी होण्यासाठी पुणे विद्यापीठाचे नाशिक व अहमदनगर येथे उपकेंद्र स्थापन करण्याच्या विचाराधीन असलेल्या बाबीवर शासनाचा विचार पूर्ण झाला आहे काय,
(२) असल्यास, पुणे विद्यापीठाच्या नाशिक कॅम्पसला मान्यता देण्याचा प्रस्ताव मा.मंत्रीमंडळाच्या मान्यतेसाठी सादर करण्याच्या अनुषंगाने विहित कार्यपध्दतीनुसार विविध विभागाची मान्यता घेऊन मा.मंत्रीमंडळाच्या मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करणेची सुरु असलेली कार्यवाही पूर्ण झाली आहे काय,
(३) असल्यास, प्रस्ताव मंत्रीमंडळासमोर ठेवण्यात आला आहे काय व त्यानुषंगाने पुढे कोणती कार्यवाही करण्यात आली व उक्त उपकेंद्र कार्यान्वीत होण्याबाबतची सद्यस्थिती काय आहे,
(४) नाशिक येथे विद्यापीठाचे उपकेंद्र स्थापन करण्याऐवजी पुणे विद्यापीठाचे विभाजन करुन नवीन स्वतंत्र नाशिक विद्यापीठ करणेबाबत शासनाचे धोरण काय आहे,
(५) सन २०१४-१५ या शैक्षणिक वर्षामध्ये पुणे विद्यापीठाशी संलग्न असलेल्या महाविद्यालयांची झालेली मोठी संख्या विचारात घेता नाशिक परिसरातील शैक्षणिक विस्तार पाहता नाशिक येथे स्वतंत्र विद्यापीठ स्थापनेबाबत शासन कोणता विचार करीत आहे वा करणार आहे ?

**श्री. विनोद तावडे :** (१) नाही.
(२) व (३) वित्त विभागाच्या अभिप्रायानुसार सदर प्रस्ताव मा.मंत्रीमंडळाच्या पुर्नविचारार्थ सादर करण्यात येत आहे.
(४) व (५) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे विभाजन करुन नाशिक येथे नविन स्वतंत्र विद्यापीठ स्थापन करण्याचा शासनाचा प्रस्ताव नाही.

-----------------

**राज्यातील शाळांमध्ये प्रयोशाळा सहाय्यक व परिचर आणि ग्रंथपाल नेमण्याबाबत**

**(८) * ३३७५ श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शाळा तिथे प्रयोशाळा सहाय्यक व परिचर आणि ग्रंथपाल नेमण्याबाबत शासनाकडे वांरवार होणाऱ्या मागणीबाबत शासनाने निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याचे स्वरुप काय व अंमलबजावणीबाबत कार्यवाही झाली आहे काय,

(३) पाचशेहून पटसंख्या असलेल्या शाळांना बी.एस.स्सी. (B.S.C.) पात्रताधारक प्रयोगशाळा सहाय्यक (उपशिक्षक) आणि बारावी सायन्स उत्तीर्ण प्रयोगशाळा परिचर तर ग्रंथालयांसाठी बी.लीप पदवीधारक ग्रंथपाल (उपशिक्षक) नेमण्याबाबत शासनाने विचार केला आहे काय ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) नाही.

-----------------

**राज्यातील शालेय पोषण आहार योजनेसाठी मध्यवर्ती स्वयंपाकघर ठेवण्याबाबत**

**(९) * ३२०५ श्रीमती दिप्ती चवधरी, डॉ.सुधीर तांबे, श्री.आनंदराव पाटील, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.सुभाष झांबड :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शालेय पोषण आहार योजनेसाठी मध्यवर्ती स्वयंपाकघर ठेवण्याबाबत निर्णय घेण्यात आला असल्याचे व या योजनेत माहिला बचत गटाचा सहभाग करण्याचा शासनाने निर्णय घेण्यात आल्याचे माहे जानेवारी २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निर्णयाची त्वरीत अंमलबजावणी होण्यासाठी शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विनोद तावडे :** (१) शालेय पोषण आहार योजनेंतर्गत नागरी भागामधील शाळांमध्ये तयार आहाराचा पुरवठा करण्यासाठी केंद्रीय स्वयंपाकगृह प्रणाली राबविण्याचा निर्णय शासनाने दि.१८ जून, २००९ रोजी घेतला आहे.

(२) व (३) सदर शासन निर्णयानुसार स्वारस्याची अभिव्यक्ती अर्ज मागवून संस्थांची निवड करण्यात आली आहे. तथापि मा.उच्च न्यायालयामध्ये याविरोधात याचिका दाखल झालेल्या होत्या. सदर याचिकांवर शासनाच्या बाजूने निर्णय झालेला आहे. तथापि मा.उच्च न्यायालयाने सदर योजनेमधून शिक्षकांचा सहभाग वगळण्याचे आदेश दिलेले आहे. शालेय पोषण आहार योजनेमध्ये शिक्षकांचा सहभाग आवश्यक आहे. यामुळे शासनाने मा.उच्च न्यायालयाच्या या निर्णयाविरुद्ध मा.सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिका (SLP) दाखल केलेली आहे.

-----------------

**मौजे वडवली नवापाडा (जि.पालघर) येथे कंपनीच्या सांडपाण्यामुळे स्थानिक नागरिकांच्या आरोग्यावर होत असलेले दुष्परिणाम**

**(१०) * ४०७८ श्री.आनंद ठाकूर, श्री.सुनिल तटकरे, श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले, श्री.राहुल नार्वेकर :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे वडवली नवापाडा (जि.पालघर) येथील सेटवाला फूडस प्रा.लि.या कंपनीतील सांडपाण्यामुळे तेथील गावपाडयात दुर्गंधी पसरुन महिला, मुले, नागरिकांना त्वचारोग, काविळ इत्यादी रोगांची लागण झाल्याने स्थानिक नागरीकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला असल्याचे दिनांक १ जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी वा पाहणी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्याअनुषंगाने या परिसरातील नागरिकांच्या आरोग्याला होणारा धोका टाळण्यासाठी शासन सदर कंपनीविरुध्द कोणती कारवाई करणार आहे वा करण्यात येत आहे,

(४) अद्यापी,कारवाई वा उपाययोजना केली नसल्यास होत असलेल्या दिरंगाईची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) सांडपाण्यामुळे दुर्गंधी पसरली होती हे खरे आहे, परंतु आरोग्य अधिकारी यांच्या अहवालानुसार या कारणास्तव त्वचा रोग, काविळ इत्यादी रुग्णांची नोंद नाही.

(२) होय.

दैनिक सकाळ वृत्त पत्रात दिनांक २/१/२०१५ रोजी प्रसिध्द झालेल्या बातमीच्या अनुषंगाने दिनांक ३/१/२०१५ रोजी उद्योगास महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने भेट देऊन पाहणी केली.

(३) उद्योगातून निर्माण होणारे प्रक्रियाकृत सांडपाणी उद्योगाच्या आवारात फवारणी करताना आढळून आले. फवारणी केलेल्या पाण्यामुळे सभोवतालच्या परिसरात वास येत असल्याचे दिनांक ०३/०१/२०१५ रोजीच्या पाहणीत जाणवले. तसेच, उद्योगाच्या सांडपाणी प्रक्रिया यंत्रणेच्या एरीएशन टाकीमध्ये बायोमासचे प्रमाण कमी असल्याचे दिसून आले. सबब, मंडळाने उद्योगास दि. ०७/०१/२०१५ रोजी समज दिली व दिनांक ०५/०३/२०१५ रोजी उद्योगास कारणे दाखवा नोटीस बजावली आहे.

(४) उद्योगाची मंडळाने दिनांक ०५/०३/२०१५ रोजी पुनश्च: पाहणी केली असून पाहणी दरम्यान उद्योगाने बायोमास वाढविण्यासाठी कल्चर एरिएशन टँकमध्ये टाकल्याचे कंपनी प्रतिनिधींनी सांगितले. तसेच उद्योगाने परिसरात प्रक्रियाकृत सांडपाणी फवारणी बंद केली असून वासाचा प्रार्दुभाव टाळण्यासाठी सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा परिसरात ब्लीचिंग पावडर टाकली जात असल्याचे आढळून आले.

-----------------

**मराठी भाषा विभागाची पुनर्रचना करण्याबाबत**

**(११) * ३४७३ श्री.जयवंतराव जाधव, श्री.अनिल भोसले, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **मराठी भाषा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजभाषेच्या विकासासाठी व दिर्घकालीन नियोजनासाठी मराठी भाषा विभागाची पुनर्रचना करण्याची राज्यातील लोकप्रतिनिधींनी वेळोवेळी शासनाकडे मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) मराठी अभ्यासकेंद्राने राजभाषा मराठी विभागाच्या पुनर्रचनेसाठी पाठविलेला प्रस्ताव माहे एप्रिल, २०१० पासून तब्बल दहा वेळा शासनास सादर करुनही अद्याप तो शासनाच्या लालफितीत अडकल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच मराठी विद्यापीठ स्थापनेचा प्रस्ताव अनेक वर्षापासून शासनाकडे प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मराठी भाषेचा लोकभाषा म्हणून विकास करण्यासाठी व मराठी भाषेचा प्रतिष्ठा उंचावण्यासाठी प्रश्न भाग (१), (२) व (३) बाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय.

(२) नाही.

मराठी अभ्यास केंद्राच्या प्रस्तावावर शासन स्तरावर झालेल्या बैठकीमध्ये अभ्यास केंद्राच्या मागणीनुसार ६ नवीन उपविभागांसाठी अतिरीक्त मनुष्यबळ देणे सध्या शक्य नसल्याचे सुचित करण्यात आले. तथापि, मराठी अभ्यास केंद्राने केलेल्या काही सूचनांचा प्रस्तावित मराठी भाषा धोरणामध्ये समावेश करण्यात आला आहे.

(३) भाषा सल्लागार समितीने केलेल्या शिफारशींच्या अनुषंगाने, मराठी भाषा विद्यापीठ स्थापन करण्यासाठी सर्व बाबींचा अभ्यास करुन शासनास अहवाल सादर करण्यासाठी समिती गठीत करण्याची कार्यवाही सुरू आहे.

(४) २), ३) व ४) बाबत वरीलप्रमाणे कार्यवाही सुरू आहे.

-----------------

**पुण्यातील ससून रुग्णालयात सुधारणा व अनुपस्थित राहणा-या कर्मचा-यांवर कारवाई करण्याबाबत**

**(१२) * ३४२२ श्री.अनिल भोसले, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.अमरसिंह पंडित, श्री.हेमंत टकले :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुण्यातील ससून रुग्णालयात प्रशासनाचा ढिसाळपणा, रुग्णांची हेळसांड, अस्वच्छता व रुग्णालयात उपलब्ध औषधे रुग्णांना बाहेरुन आणण्यास सांगत असल्याचे तसेच बरेच कर्मचारी कामाच्या वेळेत अनुपस्थित असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार ससून रुग्णालयात सुधारणा करण्याबाबत व अनुपस्थितांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**श्रीवर्धन (जि.रायगड) तालुक्यातील केशरी शिधापत्रिकाधारकांना धान्य न मिळाल्याबाबत**

**(१३) * ३८८६ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्रीवर्धन (जि.रायगड) तालुक्यात केशरी शिधापत्रिकाधारकांना गेल्या तीन महिन्यापासून धान्य मिळाले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, श्रीवर्धन तालुक्यामध्ये एकूण किती केशरी शिधापत्रिकाधारक आहेत,

(३)असल्यास, शिधापत्रिकेवर धान्य न मिळाल्याने कार्डधारकांनी महसूल विभागाकडे वारंवार तक्रारी करुन देखील अद्याप कोणतीच कार्यवाही केली नाही, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुषंगाने केशरी शिधापत्रिकाधारकांना धान्य पुरवठा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. गिरीश बापट :** (१) राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत समाविष्ट झालेल्या एपीएल (केशरी) लाभार्थ्यांना अनुदानित दराने अन्नधान्य देण्यात येते.

(२) १३,६१२

(३) व (४) राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियमांतर्गत पात्र लाभार्थ्यांना विहित परिमाणानुसार धान्य मिळत नसल्याबाबतच्या तक्रारी प्राप्त झाल्यास त्यानुसार धान्य उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही करण्यात येते.

(५) राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेअंतर्गत समाविष्ट न झालेल्या ए.पी.एल. (केशरी) शिधापत्रिकाधारकांना राज्यशासनाने आर्थिक भार सोसून अन्नधान्य देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

-----------------

**राज्यात महाराष्ट्र केसरीचा किताब जिंकणारे मल्ल (पहेलवान) यांच्या मानधनाबाबत**

**(१४) * ३९३३ श्री.सतिश चव्हाण, श्री.संदिप बाजोरिया, श्री.हेमंत टकले, श्री.प्रकाश गजभिये, डॉ.सुधीर तांबे, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.अमरसिंह पंडित, श्री.ख्वाजा बेग, श्री.विक्रम काळे, श्री.अनिल भोसले, श्री.धनंजय मुंडे :** सन्माननीय **क्रिडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात महाराष्ट्र केसरी चा किताब जिंकणारे मल्ल (पहेलवान) यांना फक्त रु.६०००/- दरमहा मानधन मिळते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रत्यक्षात मल्ल (पहेलवान) यांना शरीरयष्टी सक्षम ठेवण्यासाठी (आहार) खुराकासाठी १५ ते २०,०००/- रुपये खर्च अपेक्षित आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, संबंधितांना मानधन वाढवून देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय.
(२), (३) व (४) महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषदेने केलेली मागणी विचारात घेवून महाराष्ट्र केसरी किताब प्राप्त कुस्तीगीरांना मिळणाऱ्या दरमहा रु. ४,०००/- एवढया मानधनात दिनांक २१.१२.२०१० च्या शासन निर्णयान्वये वाढ करण्यात आली असून ते दरमहा रु.६,०००/- एवढे करण्यात आले आहे. सदर मानधन खेडाळूंना सन्मान म्हणून देण्यात येते. स्पर्धेच्या तयारीसाठी अर्थसहाय्य अन्य योजनांतून मिळू शकते.

-----------------

**शासन सेवेत सलग १२ वर्षे सेवा झालेल्या कर्मचाऱ्यांना वरिष्ठ वेतनश्रेणी लागू करण्याबाबत**

**(१५) * ३५४५ ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासन धोरणानुसार व सेवाविषयक नियमावलीनुसार शासन सेवेत सलग १२ वर्षे झालेल्या कर्मचाऱ्यांना वरिष्ठ वेतन श्रेणी लागू करण्यात येते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यानुसार शालेय शिक्षण विभागांतर्गत अनुदानित व विनाअनुदानित शाळांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना नियुक्ती दिनांकापासून १२ वर्षे झालेली सेवा ग्राह्य धरुन वरिष्ठ वेतन श्रेणी लागू करण्यात आलेली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे अखत्यारितील अशासकीय तंत्र विद्यालयातील निदेशकांची अनुदानित कालावधीतील सेवा ग्राह्य न धरण्याचा निर्णय शासनाने (उच्च व तंत्र शिक्षण विभाग) घेतला असल्याने नेरुळ, नवी मुंबई येथील तेरणा विद्यालयातील निदेशकांवर अन्याय झाला असल्याचे माहे एप्रिल, २०१४ मध्ये निदर्शनास आले आहे, हेही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी तेरणा विद्यालयातील (नेरुळ, नवी मुंबई) संबंधित निदेशकांनी संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य ; प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांना माहे मे, २०१४ मध्ये तसेच त्याप्रकरणी फेरविचार करून निर्णय घेण्याबाबत लोकप्रतिनिधींनी तत्कालिन मा.उच्च व तंत्र शिक्षण मंत्री यांना दिनांक १२ मे, २०१४ रोजी तसेच विद्यमान उच्च व तंत्र शिक्षण मंत्री महोदय यांना दिनांक २६ नोव्हेंबर, २०१४ रोजी पत्र निवेदने दिली आहेत, हेही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर पत्र निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,
(६) असल्यास, सदरहू निर्णय केव्हा घेण्यात आला,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय.

१२ वर्षाच्या नियमित व अर्हताकारी सेवेनंतर वरिष्ठ वेतनश्रेणी दिली जाते.

(२) होय.

(३) सदर प्रश्न केवळ नेरुळ, नवी मुंबई येथील तेरणा विद्यालयाचा नसून राज्यातील सर्व अशासकीय तंत्र विद्यालयातील शिक्षक/ निदेशकांचे अनुदानित कालावधीतील सेवा ग्राह्य धरणे किंवा न धरणे याबाबत आहे. सदर बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

(४) होय, दि. २६.११.२०१४ चे निवेदन प्राप्त झाले आहे.

(५), (६) व (७) सदर बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

-----------------

### मौजे कोर्टी (ता.करमाळा, जि.सोलापूर) येथील शिवाजी हायस्कूलमधील विद्यार्थ्यांना झालेली विषबाधा

**(१६) * ३७३६ श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.सतिश चव्हाण, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.सुनिल तटकरे, श्री.अनिल भोसले, श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.ख्वाजा बेग, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.जगन्नाथ शिंदे, श्रीमती विद्या चव्हाण, ॲड.निरंजन डावखरे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.शरद रणपिसे, श्री.सुभाष झांबड, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.सुधीर तांबे, श्री.हरिसिंग राठोड, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्रीमती हुस्नबानू खलिफे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे कोर्टी (ता.करमाळा, जि.सोलापूर) येथील शिवाजी हायस्कूलमधील १७५ विद्यार्थ्यांना खिचडीतून विषबाधा झाल्याची घटना माहे जानेवारी, २०१५ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार सदर प्रकरणी जबाबदार असणाऱ्यांवर शासनाने कोणती कडक कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) तसेच विषबाधा झालेल्या विद्यार्थ्यांना औषधोपचार करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. विनोद तावडे :** (१) दि.३/१/२०१५ रोजी सदर शाळेतील विद्यार्थ्यांनी शालेय पोषण आहार खाल्यानंतर २२३ पैकी ११७ विद्यार्थ्यांना उलटी, मळमळ व पोटदुखीचा त्रास झाला होता.

(२) व (३) सदर प्रकरणी राज्य सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळा, पुणे येथे तांदळाची तपासणी केली असता तांदळाला केरोसिनचा वास येत असल्याचे व त्यामध्ये किटकनाशकाचा अंश असल्याचे निष्पन्न झाले आहे. तसेच, स्वयंपाकगृह, पाणी यामध्येही अस्वच्छता आढळून

आली आहे. तांदळाबाबत तपासणी करण्यासाठी भारतीय अन्नधान्य महामंडळास कळविण्यात आले आहे. संबंधित शाळेचे मुख्याध्यापक स्वयंपाकी व मदतनीस यांच्यावर पोलिस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

(४) उलटी, मळमळ व पोटदुखीचा त्रास झालेल्या सर्व विद्यार्थ्यांवर तात्काळ उपचार करण्यात आले आहेत.

-----------------

**गोंदिया जिल्ह्यात शिक्षण विभाग सुरु करण्याबाबत**

**(१७) * २७६७ श्री.नागो गाणार, श्री.अनिल सोले, श्री.रामनाथ मोते :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंदिया जिल्ह्याची निर्मिती दिनांक १ मे, १९९९ रोजी झाली असून सन २००० पासून गोंदिया जिल्ह्यात शिक्षण विभाग सुरु करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागील १५ वर्षापासून गोंदिया येथील शिक्षण विभाग व अधिक्षक वेतनपथक (प्राथमिक व माध्यमिक) या कार्यालयामध्ये अनेक पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या विभागात कोणकोणती पदे रिक्त आहेत आणि ही रिक्त पदे शासन त्वरीत भरणार आहे काय व केव्हापर्यंत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे. तथापि, रिक्त पदांमुळे दैनंदिन कामकाजाची अडचण होऊ नये म्हणून उपलब्ध अधिकारी/कर्मचारी यांच्याकडून कामकाज पुर्ण करण्यात येत आहे.

(३) वर्ग - १ मधील २ पदे, वर्ग-२ मधील १४ पदे रिक्त आहेत. सदर रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

-----------------

**अलिबाग (जि.रायगड) तालुक्यातील पद्मदुर्ग किल्ल्याची झालेली दुरवस्था**

**(१८) * ३२३७ श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.आनंदराव पाटील, श्री.हरिसिंग राठोड, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आलिबाग जिल्ह्यातील इतिहासाचा साक्षीदार असलेल्या पद्मदुर्ग किल्ल्याचे तटबंदी ढासळलेली असून तोफा गंजून जीर्ण झालेल्या आहेत बुरूजांची दुरवस्था व इमारतीची पडझड झालेली असूनही पुरातत्व विभागाचे याकडे दुर्लक्ष होत असल्याचे माहे जानेवारी २०१५ मध्ये वा त्या दरम्यान आढळून आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू किल्ल्याची तातडीने दुरूस्ती होण्याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विनोद तावडे :** (१) पद्मदुर्ग किल्ला हा राष्ट्रीय संरक्षित स्मारक असून तो भारतीय पुरातत्व सर्वेक्षण मंडल कार्यालय मुंबई यांच्या अखत्यारीत येतो. त्यांनी दिलेल्या माहितीनुसार पद्मदुर्ग किल्ल्यातील तटबंदी व वास्तु अवशेष थोडया प्रमाणात ढासळलेली असून तेथे झाडे-झुडपे उगवलेली आहे.

(२) व (३) सन २०१२-१३ व सन २०१३-१४ मध्ये पद्मदुर्ग किल्ल्याच्या जतन व दुरुस्तीची अनुक्रमे रु.२२,५६,८२१/- व रु. ३,००,०००/- इतक्या रकमेची कामे भारतीय पुरातत्व सर्वेक्षण मार्फत करण्यात आली आहेत. सदर किल्ल्याच्या जतन व दुरुस्तीचे काम सन २०१५-१६ मध्ये घेण्याचे प्रस्तावित असून हे काम निधीच्या उपलब्धततेनुसार करण्यात येईल.

-----------------

**वैभववाडी (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यात शालेय पोषण आहार योजनेत मोठया प्रमाणावर होत असलेला भ्रष्टाचार**

**(१९) * ४२३७ श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.सुधीर तांबे, श्री.हरिसिंग राठोड, प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वैभववाडी (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यात शालेय पोषण आहारासाठी पुरविण्यात येणारे धान्य निकृष्ट दर्जाचे व हलक्या प्रतीचे असून या योजनेत मोठया प्रमाणावर भ्रष्टाचार होत असल्याबाबत पंचायत समिती सदस्यांनी आरोप केल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने याप्रकरणातील संबंधित अधिकारी व कंत्राटदारांवर कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,

(४) अद्याप, याप्रकरणी कारवाई करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) वैभववाडी, जि.सिंधुदुर्ग येथील पंचायत समिती सदस्यांनी शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत पुरविण्यात येणा-या धान्याबाबत तपासणी करण्याची सूचना केलेली होती.

(२) व (३) सदर सूचनेच्या अनुषंगाने धान्याच्या नमुन्यांची तपासणी राज्य सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळा, पुणे येथे केली असता धान्य मानकानुसार असल्याचे आढळून आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**वृध्द कलावंताना तातडीने मानधन देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही**

**(२०) * ४५०७ श्री.सुभाष झांबड, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्हा परिषदेतील समाजकल्याण विभागाच्यावतीने वृध्द कलावंताना मानधन देण्याचे १७७ प्रस्ताव मंजूर करण्यात येऊनही एकाही लाभार्थ्याला अद्याप मानधन मिळाले नसल्याचे माहे डिसेंबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान आढळून आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वृध्द कलावंताना तातडीने मानधन मिळण्यासाठी शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) औरंगाबाद जिल्हा परिषदेकडून वृध्द कलावंतांना मानधन देण्याचे १७७ प्रस्ताव मंजूर करण्याबाबतचा कोणताही प्रस्ताव शासनास प्राप्त झालेला नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**ठाणे महापालिकेने शासनास सादर केलेला तलाव सुशोभिकरणचा प्रस्ताव प्रलंबित असल्याबाबत**

**(२१) * ४५४४ श्री.जगन्नाथ शिंदे :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नॅशनल लेक कन्झर्व्हेशन प्रोग्राम अंतर्गत ठाणे शहरातील तलावांना प्रदूषणमुक्त करुन त्यांचे सुशोभिकरण करण्याचे ठाणे महानगरपालिकेने निश्चित केले असून या प्रकल्पासाठी आवश्यक असलेला ६५ कोटी रुपयांचा निधी मिळावा म्हणून मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्ताव शासनास सादर होऊन १० महिन्यांचा कालावधी उलटून गेला तरीही त्यास मंजूरी न मिळाल्यामुळे ठाण्यातील तलावांचे सुशोभिकरणाचे काम संपूर्णत: रखडलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रस्तावास त्वरित मंजूरी देण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत,

**श्री. रामदास कदम :** (१) होय.

(२) तलावांचे पर्यावरणीयदृष्टया संरक्षण व संवर्धनार्थ निश्चित निकषांआधारे ठाणे महानगरपालिकेकडून सहा तलावांच्या संवर्धनासाठी एकूण रुपये १७.७८ कोटी खर्चाचे सुधारित प्रस्ताव दिनांक १७ जून, २०१४ रोजी प्राप्त झाले. सदर प्रस्ताव दि. ५ फेब्रुवारी, २०१५ रोजी झालेल्या सुकाणू समितीच्या बैठकीत ठेवण्यात आले. सदर बैठकीत तीन तलावांचे एकूण रुपये ६.५८ कोटी खर्चाचे प्रस्ताव अटी व शर्तीच्या अधिन राहून मान्य करण्यात आले आहे. उर्वरीत प्रस्तावांबाबत ठाणे महानगरपालिकेकडून माहिती अप्राप्त आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**चंद्रपूर जिल्हयातील विरुर स्टेशन येथे तांदळाची तस्करी झाल्याबाबत**

**(२२) * ५१६७ श्रीमती शोभाताई फडणवीस :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्यातील विरुर स्टेशन येथे आंध्रप्रदेशातून रेल्वे पॅसेजर गाडीने १५० क्विंटल तांदूळ तस्करी करतांना पकडल्याचे दिनांक २५ जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली काय, व त्यात काय आढळून आले व त्यावर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) दि. २४.०१.२०१५ रोजी रेल्वे सुरक्षाबलाच्या तेलंगणा येथील पेट्रोलींग कर्मचा-यांना विरुर स्टेशन येथील प्रवासी रेल्वेमध्ये २५.८० क्विं. तांदूळ बेवारस आढळला.
(२) प्रस्तुत प्रकरणी रेल्वे सुरक्षाबलाच्या कर्मचा-यांनी कारवाई करुन तेलंगणा येथील अधिकाऱ्यांच्या ताब्यात सदरचा तांदूळ परस्पर दिलेला असून महाराष्ट्र शासनाचा या प्रकरणाशी कोणताही संबंध नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**जळगाव, धुळे, नंदुरबार जिल्ह्यातील उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ व संलग्न महाविद्यालयामधील प्राध्यापकानी बोगस पी.एच.डी पदव्या मिळविल्याबाबत**

**(२३) * ५२०१ प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगाव, धुळे, नंदुरबार जिल्ह्यातील उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ व संलग्न महाविद्यालयामधील काही प्राध्यापकांनी सी.एम जे व इतर विद्यापीठाच्या बोगस पी.एच.डी मिळविल्याचे तक्रारीच्या अनुषंगाने उक्त जिल्ह्यातील १६ प्राध्यापकांची चौकशी करण्यासाठी विद्यापीठाने डॉ.डी.आर.पाटील यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती नेमण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरील समिती या प्रकारणी अतिशय मंद गतीने काम करीत असल्याने उक्त प्रकरणावर निर्णय होण्यास विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी संबंधितावर त्वरीत कारवाई करण्याबाबत शासनाने पुढे कोणती कारवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे अंशतः खरे आहे.
प्राध्यापकांच्या पदव्यांची पडताळणी करण्यासाठी प्रा.डॉ.डी.जी.हुंडीवाले यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली आहे आणि सदर समिती अंतर्गत प्राचार्य डॉ.डी.आर.पाटील यांच्या अध्यक्षतेखाली पदवी पळताळणीसाठी एक उपसमिती गठीत केलेली आहे.
(२) हे खरे नाही.
(३) सदर उपसमितीस संबंधित विद्यापीठांना त्वरीत भेटी देण्याबाबत निदेश दिलेले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## परळी औष्णिक विद्युत केंद्रातील राखेमुळे होत असलेले प्रदुषण रोखण्यासाठी करावयाची कार्यवाही

**(२४) * ५५६५ श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.अमरसिंह पंडित :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परळी औष्णिक विद्युत केंद्रातील राखेच्या प्रदुषणामुळे परळी व परिसरातील नागरिकांच्या आरोग्य धोक्यात आल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रदुषण नियंत्रणासाठी प्रदुषण नियंत्रण महामंडळाने दिलेल्या सुचनांची अंमलबजावणी होत नसल्याने प्रदुषणात दिवसेंदिवस वाढ होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रदुषणाचा नागरिक, जनावरे व शेतीपिकांवर परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, प्रदुषण नियंत्रणाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) व (२) हे खरे नाही.

तथापि परळी औष्णिक विद्युत केंद्रातील राखेची गुणवत्ता तपासली असता हवेच्या पृथ:क्करण अहवालावरुन युनिट क्र. ४, ५, ६ व ७ मधून चिमणीवाटे उत्सर्जित होणाऱ्या धुरामध्ये धुलीकणांचे प्रमाण संमतीपत्रामध्ये नेमून दिलेल्या विहित मर्यादेपेक्षा जास्त आढळून येते.

(३) वैदयकीय अधिक्षक, उप जिल्हा रुग्णालय परळी वैजनाथ यांच्या अहवालावरुन मागील पाच वर्षामधील दाखल झालेल्या श्वसनाच्या आजाराच्या रुग्णांचे प्रमाण हे सन २०१४-२०१५ या वर्षामध्ये बऱ्याच प्रमाणात कमी झालेले दिसून येते.

तालुका कृषी अधिकारी, परळी वैजनाथ यांच्या अहवालावरुन प्रदूषणाच्या शेती पिकावर परिणाम होत आहे याबाबत काही निष्कर्षाप्रत पोहचता येत नाही.

उप आयुक्त, जिल्हा पशु संवर्धन, बीड यांच्या अहवालावरुन असे निर्दशनास येते की, परळी व परिसरातील जनावरांना कोणत्याही प्रकारे सदर प्रदूषण सदृश लक्षणे अथवा रोग आढळून आलेले नाहीत.

(४) याबाबत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने प्रदूषण नियंत्रणाबाबत औष्णिक विद्युत केंद्राकडून कृती आराखडा प्राप्त कलेला आहे. सदर कृती आराखडयाची अंमलबजावणी औष्णिक विदयुत केंद्रामार्फत सुरु आहे. कृती आराखडयाची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी रु. १.३१/- कोटी एवढया रकमेची बँक हमी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत घेण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

### राज्यात अतिरिक्त ठरलेल्या ग्रंथपालांच्या समस्यांबाबत

**(२५) * ५६१४ श्री.माणिकराव ठाकरे, डॉ.सुधीर तांबे, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने सर्व शाळांना आदेश दिले की, पूर्णवेळ ग्रंथपालांच्यावतीने विद्यार्थीसंख्या एक हजारापेक्षा कमी असेल तर अर्धवेळ ग्रंथपालांना कमी करण्यात येऊ नये या आदेशाने १९८१ च्या नियमानुसार अर्धवेळ व पूर्णवेळ ग्रंथपालांची पदे अतिरिक्त झाली, ज्या शाळांची पटसंख्या ५०० पेक्षा खाली आहेत अशा शाळांतील अर्धवेळ ग्रंथपालांचे पगार बंद करण्यात आले त्यामुळे त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली असल्याचे दिनांक ९ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील अतिरिक्त ठरलेल्या १०६७ ग्रंथपालांना सामावून घेण्यासंदर्भात शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) दिनांक २३ ऑक्टोबर, २०१३ च्या शासन निर्णयान्वये करण्यात आलेल्या ऑनलाईन संचमान्यतेनुसार काही शिक्षकेतर कर्मचारी अतिरिक्त ठरत आहेत. सदर शासन निर्णयाचा फेरविचार करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

-----------------

### दहावी आणि बारावीच्या मार्च, २०१५ मध्ये होणाऱ्या परीक्षांच्या हॉल तिकिटांमध्ये झालेल्या चुका

**(२६) * ५६२२ श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दहावी आणि बारावीच्या माहे मार्च, २०१५ मध्ये होणाऱ्या परीक्षांसाठी मुंबई शालेय विभाग मंडळाने तयार केलेल्या हॉल तिकिटांमध्ये चुका असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रश्नाची चौकशी करण्यात आली काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदर प्रकरणात दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे आहे.

(२) चुका दुरुस्त करण्यात आल्यामुळे तसेच कोणताही विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहिलेला नसल्यामुळे चौकशी करण्याची आवश्यकता नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**चिखलदरा (जि.अमरावती) तालुक्यात पाणीपुरवठा योजनांची कामे पुर्ण करण्याबाबत**

**(२७) * ५७१७ श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिखलदरा (जि.अमरावती) तालुक्यातील पाणीपुरवठा योजना प्रलंबित असून अनेक गावांमध्ये पाणीपुरवठा होत नसल्यामुळे नागरिकांना भीषण पाणीटंचाईचा सामना करावा लागत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील तालुक्यातील अनेक गावासाठी पाणीपुरवठा योजनांची कामे अपुर्ण आहेत हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यशासनाने ही बाब गांभीर्याने घेऊन सदर तालुक्यातील पाणीपुरवठा त्वरीत सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, उक्त प्रश्नाबाबत कोणतीच कार्यवाही होत नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) होय, हे अंशतः खरे आहे.

(२) होय, अंशतः खरे आहे.

चिखलदरा (जि.अमरावती) तालुक्यात एकूण २५ नवीन नळ पाणी पुरवठा योजना प्रस्तावित असून,सन २०१४-१५ या वर्षात १३ नळ योजनांची कामे पूर्ण करण्याचे लक्ष होते. त्यापैकी १० नळ योजनांची काम पूर्ण झाली असून, ३ योजनांची कामे मार्च, २०१५ अखेरपर्यंत पूर्ण होतील व पाणी पुरवठा सुरळीत चालू होईल. तालुक्यातील सुरु झालेल्या काही गावांच्या योजनांचा स्त्रोत कमी पडत असल्यामुळे तसेच तालुक्यातील अनियमित विज पुरवठ्यामुळे काही योजना बंद पडत असल्याने पाणी टंचाई भासते.

(३) चिखलदरा तालुक्यातील पाणी टंचाई जाणवणा-या १४ गावांपैकी ५ गावांमध्ये योजनांची कामे प्रगतीपथावर आहेत. उर्वरित गावांमध्ये नवीन उद्भव घेण्याची तसेच अस्तित्वातील उद्भवाची पाणी आवक क्षमता वाढविण्याच्या दृष्टीने उपाययोजना करण्यात येत आहेत.

विज पुरवठा उपलब्ध न होणा-या २२ गावांमध्ये सौर उर्जेवर आधारित पाणीपुरवठा योजना घेण्यात आलेल्या आहेत व सौर उर्जेवर आधारीत ९ नविन गावांचा समावेश वार्षिक कृती आराखड्यात करण्यात आलेला आहे.

टंचाई जाणवणा-या गावांना टंचाई कालावधीत टँकरव्दारा पाणीपुरवठा करण्यात येतो.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**महाराष्ट्रात यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठामार्फत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना थेट घरपोच पुस्तके देण्याबाबत**

**(२८) * ५९१२ श्री.ख्वाजा बेग, श्री.अनिल भोसले, श्री.जयवंतराव जाधव, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.नरेंद्र पाटील, श्री.धनंजय मुंडे, श्री.हेमंत टकले, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्रात यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठामार्फत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना थेट घरपोच पुस्तके देण्याचा निर्णय शासनाने माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) थेट घरपोच पुस्तके देण्याचा निर्णय विद्यापीठाने घेतलेला आहे.
(२) त्यानुसार विद्यार्थ्यांना घरपोच पुस्तके देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पंढरपूर, (जि.सोलापूर) तालुक्यातील व्यायामशाळा व साहित्य खरेदीमध्ये झालेला गैरव्यवहार**

**(२९) * ६०१५ श्री.नरेंद्र पाटील, श्री.अनिल भोसले, श्री.संदिप बाजोरिया, श्री.किरण पावसकर, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **क्रिडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंढरपूर, (जि.सोलापूर) तालुक्यातील व्यायामशाळा व साहित्य खरेदीमध्ये झालेल्या लाखो रुपयांच्या गैरप्रकाराची वरिष्ठ पातळीवरुन गंभीर दखल घेतली असून पंढरपूर प्रमाणेच जिल्ह्यातील अन्य तालुक्यांमध्ये देखील असे प्रकार घडले असण्याची शक्यता गृहीत धरुन संपूर्ण जिल्ह्यातील व्यायामशाळांची नव्याने चौकशी केली जाईल अशी माहिती जिल्हा क्रिडा अधिकारी भाग्यश्री बिले यांनी दिनांक २१ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास दिलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पंढरपूर तालुक्यातील ३४ व्यायामशाळामध्ये गैरव्यवहार झालेला असून त्यापैकी १० व्यायाम शाळेची चौकशी पूर्ण झाली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणात क्रिडा विभागातील अधिकारी, कर्मचारी व व्यायामशाळेतील संस्था मालकांनी संगनमताने गैरव्यवहार केल्याचे निदर्शनास आलेले आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाने वरील प्रकरणाची चौकशी केली आहे काय, त्यात त्यांना काय आढळून आले, त्यानुसार शासनाने संबंधित दोषी अधिकारी व संबंधित संस्थेवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) अद्याप शासनाने वरील प्रकरणाची चौकशी केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे आहे.
(२), (३), (४) व (५) याप्रकरणी तीन व्यायामशाळांची तपासणी करण्यात आलेली असून उर्वरित संस्थांची तपासणी करण्याची कार्यवाही सुरु आहे.

-----------------

**नंदुरबार जिल्ह्यातील सार्वजनिक व्यवस्थेअंतर्गत वाहतुक करणा-या मक्तेदाराबाबत तक्रारी आल्याने करावयाची योग्य ती कारवाई**

**(३०) * ६०३९ श्री.चंद्रकांत रघुवंशी :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे जिल्ह्यातील सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत द्वारपोच योजनेची वाहतुक करणा-या ठेकेदाराने सदरील योजनेचे धान्य काळ्याबाजारात विक्री करत असतांना ट्रक पकडण्यात आले असल्याचे माहे नोव्हेंबर-डिसेंबर, २०१४ च्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच, नंदूरबार जिल्ह्यातील सार्वजनिक वितरण व्यवस्थेमध्ये टेंडरला पात्र होण्यासाठी शपथपत्रावर दाखविण्यात आलेल्या गाडीतून वाहतूक न करता दुस-याच गाडीतून वाहतूक करीत असल्याचे माहे नोव्हेंबर-डिसेंबर, २०१४ च्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) तसेच, शासनाच्या धोरणामुळे धुळे व नंदूबार जिल्ह्यातील सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे धान्य द्वारपोच न करता तहसिलदारांच्या गोदामातूनच मक्तेदार स्वस्त धान्य दुकानदारांना देऊन टाकत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीत काय आढळून व त्यानुसार सदर प्रकरणातील दोषींवर कोणती कडक कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) अद्याप कोणतीच कारवाई केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) धुळे जिल्ह्याच्या शिरपूर तालुक्यातील होळनाथा येथील शासकीय गोदामाचा १५७ क्विंटल, २० किलो ५२५ ग्रॅम गहू या गोदामात न नेता तो वाहन चालकाच्या गावी, रा.करवंद, ता.शिरपूर येथे नेताना तालुका पुरवठा कार्यालयातील अधिकाऱ्यांनी दि. १४ ऑक्टोबर, २०१४ रोजी ताब्यात घेतला. सदर वाहन जप्त करुन वाहन चालक व कंत्राटदार यांचेविरुध्द शिरपूर पोलिस स्टेशनमध्ये दि. १५ ऑक्टोबर, २०१४ रोजी फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. वाहनातील धान्य पुन्हा गोदामात जमा करण्यात आले आहे.

(२) नंदूरबार जिल्ह्यामध्ये निविदे दरम्यान शपथपत्रावर दाखविलेल्या वाहनांव्यतिरिक्त अन्य वाहनांद्वारे वाहतूक करण्यात येत असली तरी यासंदर्भात आवश्यक ती कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करण्यात आलेली आहे.

(३) हे खरे नाही.

(४), (५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**अशासकीय अनुदानीत महाविद्यालयातील ग्रंथालय परिचर व प्रयोगशाळा परिचर यांना कालबध्द वेतनश्रेणीत वाढ मिळणेबाबत**

**(३१) * ६२८२ श्री.अमरसिंह पंडित, श्री.धनंजय मुंडे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अशासकीय महाविद्यालयातील प्रयोगशाळा व ग्रंथालय परिचरांना दिनांक २३ मार्च, १९९८ रोजीच्या शासन निर्णयानुसार पाचव्या वेतन आयोगातील वेतनश्रेणी मिळालेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिक्षण संचालक (उच्च शिक्षण, पुणे) यांनी दिनांक ४ एप्रिल, २०१४ रोजी प्रयोगशाळा व ग्रंथालय परिचरांना ६ व्या वेतन आयोगानुसार पे-बॉंड ५२००-२०२०० मध्ये ग्रेड-पे २४०० देणे बाबतचा प्रस्ताव शासनाला सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अशासकीय महाविद्यालयीन शिक्षकेत्तर कर्मचारी संघ यांनी केलेली मागणी आणि आंदोलनाची भुमिका लक्षात घेऊन प्रयोगशाळा व ग्रंथालय परिचरांना कालबध्द वेतनश्रेणी वाढ देण्यासाठी शासन कोणती कार्यवाही करणार आहे वा करण्यात येत आहे,
(४) प्रयोगशाळा व ग्रंथालय परिचरांना कालबध्द वेतनश्रेणी वाढ देण्यासाठी झालेल्या विलंबाची कारणे कोणती ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.
(२) होय, हे खरे आहे.
(३) व (४) दि.२३/०३/१९९८ च्या शासन निर्णयानुसार त्यांना शासकीय सेवकांप्रमाणे कालबद्ध पदोन्नती योजना लागू करण्यात आलेली आहे.

-----------------

**राज्यातील शिक्षकांची भरती करणेबाबत**

**(३२) * ३२६६ श्री.रामनाथ मोते, श्री.नागो गाणार, डॉ.अपूर्व हिरे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दिनांक २ मे, २०१२ पूर्वी शिक्षकांची भरती करण्यासाठी ना हरकत प्रमाणपत्र मिळावे म्हणून प्रस्ताव सादर करूनही शासनाने भरतीस अनुमती दिली नाही अशा शाळांची व शिक्षकांची संख्या किती आहे,
(२) २ मे, २०१२ पूर्वी भरती प्रक्रिया सुरू केलेल्या व त्यानंतर नियुक्त केलेल्या शिक्षकांपैकी किती शिक्षकांना शासनाने मान्यता दिली आहे,
(३) शासनास प्राप्त झालेल्या प्रस्तावांपैकी किती प्रस्ताव आजही निर्णयासाठी प्रलंबित आहेत,
(४) शासन निर्णयानुसार सर्व प्रस्तावांना मान्यता देणे अपेक्षित असतांनाही अनेक प्रस्ताव २ वर्षापासून प्रलंबित ठेवण्याची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१), (२), (३) व (४) दिनांक २ मे, २०१२ च्या शासन निर्णयाद्वारे शिक्षक शिक्षकेतर कर्मचा-यांच्या पदभरतीस बंदी घालण्यात आली होती. म्हणून दिनांक २ मे, २०१२ पूर्वी शिक्षकांची भरती करण्यासाठी ना हरकत प्रमाणपत्र मिळावे म्हणून शासनाकडे प्रस्ताव सादर करण्याची आवश्यकता नव्हती. तथापि दिनांक ६ सप्टेंबर, २०१२ च्या शासन निर्णयानुसार राज्यातील १२६ शिक्षकांचे प्रस्ताव उपसंचालकांमार्फत शासनास सादर करण्यात आले होते. त्यापैकी ६२ शिक्षकांना मान्यता देण्यात आली असून ८ शिक्षकांना मान्यता नाकारण्यात आली आहे. नागपूर विभागातील ५६ प्रस्तांवामध्ये त्रुटी असल्यामुळे त्या विभागास परत करण्यात आले आहेत. सद्यस्थितीत दिनांक १९ जुलै, २०१४ च्या शासन निर्णयानुसार पदभरतीवरील निर्बंध उठविण्यात आले आहेत. त्यामुळे प्रस्ताव शासनास सादर करण्याची आवश्यकता नाही.

-----------------

**राज्यातील शिक्षकांना वैद्यकिय विमा संरक्षण देण्याबाबत**

**(३३) * २८८८ डॉ.सुधीर तांबे, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शिक्षकांना वैद्यकीय बीलांच्या परिपूर्ती ऐवजी वैद्यकीय विमा संरक्षण देण्याचे शासनाचे धोरण काय आहे,

(२) असल्यास, शासन केव्हापासून याची अंमलबजावणी करणार आहे,

(३) नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) व (२) कार्यरत व सेवानिवृत्त राज्य शासकीय अधिकारी / कर्मचारी व अखिल भारतीय सेवेतील अधिकारी यांचे करिता वैद्यकीय प्रतिपूर्तीची विमाछत्र योजना वित्त विभागाच्या दिनांक ०९/०७/२०१४ च्या शासन निर्णयान्वये लागू झाली आहे. सदर योजना राज्यातील मान्यताप्राप्त खाजगी शाळेतील शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना लागू करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**प्रतापसिंह राजे विद्यालय, सातारा शाळेची झालेली दुरावस्था**

**(३४) * ३७४७ श्री.विक्रम काळे, श्री.हेमंत टकले, श्री.प्रकाश गजभिये, श्री.सतिश चव्हाण, ॲड.जयदेव गायकवाड, डॉ.सुधीर तांबे, श्री.ख्वाजा बेग, श्री.अमरसिंह पंडित, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य घटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी शिक्षण घेतलेल्या सातारा येथील प्राथमिक शाळा प्रतापसिंह राजे विद्यालयाची दुरावस्था झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शाळेची दुरावस्था सुधारणेबाबत व दर्जा वाढविणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) सदर विद्यालय हे २०० वर्षापूर्वी बांधकाम झालेल्या मा.श्री.छ. प्रतापसिंह महाराज (थोरले) यांच्या ऐतिहासिक जुन्या राजवाड्यात भरत असून या इमारतीचा समावेश हेरिटेज अंतर्गत झाल्याने त्यात कोणतेही बांधकाम व पुर्नरचना करण्यास प्रतिबंध आहे. तथापि विद्यालयाची शैक्षणिकदृष्ट्या दुरावस्था नाही.

(२) सदर विद्यालयासाठी अन्यत्र जागा उपलब्ध करुन घेण्याबाबत कार्यवाही सुरु आहे. या विद्यालयाचा शैक्षणिक दर्जा चांगला असून याअनुषंगाने विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

**मौजे निंगणूर (ता.उमरखेड, जि.यवतमाळ) येथील शिक्षकांची रिक्त पदे भरण्याबाबत**

**(३५) * ५८८१ श्री.संदिप बाजोरिया, श्री.रामराव वडकुते, श्री.सतिश चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.ख्वाजा बेग, श्री.अनिल भोसले, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.किरण पावसकर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे निंगणूर (ता.उमरखेड, जि.यवतमाळ) येथील शाळेत चारशे मुले मुलांना शिकवावयास केवळ सहा शिक्षक असून एका शिक्षकाला दोन वर्गांना शिकवावे लागत आहेत, हे खरे आहे काय,

(२) तसेच उमरखेड पंचायत समिती अंतर्गत ९४ शिक्षकांची पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) बाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार निंगणूक शाळेसह उमरखेड पंचायत समितीअंतर्गत रिक्त असलेली शिक्षकांची पदे तातडीने भरणेबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) अद्याप रिक्त पदे भरली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) नाही.

(२) उमरखेड पंचायत समिती अंतर्गत ५४ शिक्षकांची पदे रिक्त आहेत.

(३), (४) व (५) उपरोक्त ५४ पदांपैकी ३९ पदे भरण्यात आली असून उर्वरित पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

-----------------

**शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व अतिविशेषोपचार रुग्णालय, नागपूर येथे कर्मचाऱ्यांच्या ३९१ पदांचा प्रस्ताव प्रलंबित असल्याबाबत**

**(३६) * २६८२ श्री.अनिल सोले, श्री.नागो गाणार, श्री.मितेश भांगडिया :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व अतिविशेषोपचार रुग्णालय, नागपूर येथे वर्ग -३ व वर्ग-४ कर्मचाऱ्यांची अत्यंत कमतरता असल्यामुळे ३९१ पदांचा तसेच मज्जातंतू चिकीत्सा शास्त्र सुरु करण्याबाबतचा प्रस्ताव सन २०१० पासून शासनाकडे प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रलंबित प्रस्तावांना मान्यता देऊन अतिविशेषोपचार रुग्णालयामध्ये (E.E.G) ची व्यवस्था करण्याबाबत तसेच प्रस्ताव प्रलंबित ठेवणाऱ्या संबंधितांवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व अतिविशेषोपचार रुग्णालय, नागपूर येथे मज्जातंतूचिकित्सा शास्त्र हा विभाग कार्यान्वित झालेला नसल्याने (E.E.G.) ची व्यवस्था करण्यात आलेली नाही. सदर विभाग कार्यान्वित होण्यासाठी व अंशत: सुरु असणाऱ्या विषयातील डी.एम. व एम.सी.एच. अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी मानकानुसार व गरजेनुसार ३९१ नवीन पदनिर्मितीचा परिपूर्ण प्रस्ताव संचालनालय व संस्थास्तरावर तयार करण्यात येत आहे.

-----------------

**राज्यातील महाविद्यालयातील सेवानिवृत्त प्राध्यापकांना अर्जित रजेच्या रोखीकरणासाठी विशेष अनुदान मंजुर होणेबाबत**

**(३७) * ५२७० डॉ.अपूर्व हिरे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विविध विद्यापीठे (विशेषतः पुणे विद्यापीठ) व अशासकीय वरिष्ठ महाविद्यालयातील सेवानिवृत्त प्राध्यापकांना अर्जित रजेचा लाभ देऊन त्यांच्या शिल्लक अर्जित रजेचे रोखीकरण करणेसंदर्भात पुणे विद्यापीठाने घेतलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने मा.मुंबई उच्च न्यायालयानेही सेवानिवृत्त प्राध्यापकांना अर्जित रजेचे रोखीकरण करणेबाबत, आदेश दिलेले आहेत, हे खरे आहे काय, यासंबंधी कोणती कार्यवाही केली आहे,

(२) असल्यास, अशासकीय अनुदानित वरिष्ठ महाविद्यालयांना मा.मुंबई उच्च न्यायालयाने निर्देशाबरहुकूम अशा प्रकारच्या अर्जित रजा रोखीकरणासाठी शासनाकडून कोणतेही अनुदान दिले जात नाही, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे आदेशानुसार संबंधित प्राध्यापकांचे अर्जित रजेचे रोखीकरण करणेकरिता विशेष अनुदानाची तरतुद करणे आवश्यक असून याबाबत शासनाची भुमिका काय आहे व याबाबत कोणती कार्यवाही करण्यात येत आहे वा येणार आहे ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय, मा.न्यायालयाच्या आदेशा विरुद्ध शासनाच्या वतीने मा.सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे विशेष अनुमती याचिका क्र.२७२८६ व क्र.२७२८७/०९ दाखल करण्यात आली होती. मा.सर्वोच्च न्यायालयाने सदर अर्जित रजेचे रोखीकरण शासनाकडून अनुज्ञेय होणार नसल्याबाबत निर्णय दिला आहे.

(२) होय.

(३) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने दिनांक १३.१०.२०१२ रोजीच्या ठरावान्वये विद्यापीठ परिनियम ४२४ (सी) दिनांक ०३.०२.२०१५ पासून रद्द केला असून, त्यास माननीय राज्यपाल महोदयांची मान्यता प्राप्त झाली आहे, सदर परिनियम रद्द करित असताना शासनावर कोणताही प्रकारचा प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष आर्थिक भार सद्यस्थितीत अथवा भविष्यात येणार नाही या अटीवर मान्यता दिली असल्याने शासनाकडून विशेष अनुदानाची आवश्यकता नाही.

-----------------

## स्कील इंडिया कार्यक्रमाअंतर्गत एमसीव्हीसी व बायफोकल अभ्यासक्रमांना वेतन अनुदान देण्याबाबत

**(३८) * ३३७१ श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयांतर्गत उच्च माध्यमिक स्तरावरील व्दिलक्षी व्यवसाय अभ्यासक्रम व उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रम या योजनांच्या आढावा घेण्यासाठी समिती गठीत करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर समितीने काय शिफारशी केल्या आहेत,

(३) तसेच मा.पंतप्रधान यांच्या स्कील इंडिया कार्यक्रमाअंतर्गत या सर्व एमसीव्हीसी व बायफोकल अभ्यासक्रमांना वेतन अनुदान देण्याचा शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) संचालनालय स्तरावर कार्यवाही सुरू आहे.

(३) वेतन अनुदान व स्कील इंडियाचा परस्पर संबंध नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## डहाणू (जि.पालघर) तालुक्यातील पुरातन किल्ल्याची झालेली दुरवस्था

**(३९) * ६०३० श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, श्री.प्रकाश बिनसाळे :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डहाणू (जि.पालघर) तालुक्यातील पुरातन किल्ला अत्यंत दुरावस्थेत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याची शासनाने चौकशी वा पाहणी केली आहे काय,

(३) असल्यास, सदर पुरातन किल्ल्याची दुरूस्ती व डागडुजी करण्याबाबत शासन कोणती तातडीची कार्यवाही वा उपाययोजना करणार आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, दिरंगाईची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) व (२) डहाणू जि.पालघर येथील किल्ला हा राज्य संरक्षित स्मारक नाही. जिल्हाधिकारी पालघर, यांनी कळविल्यानुसार डहाणू किल्ल्यामध्ये तहसिलदार डहाणू, उपकोषागार, डहाणू, राज्य गुप्तवार्ती पोलीस, दुय्यक निबंधक, डहाणू इत्यादी कार्यालये असून किल्ल्यातील सदर इमारती सुस्थितीत आहेत. सदर इमारतींची देखभाल सार्वजनिक बांधकाम उपविभाग, डहाणू यांचेमार्फत केली जाते. सद्यःस्थितीत किल्ल्याच्या बुरुजांची काही अंशी पडझड झालेली आहे.

(३) किल्ल्यातील पडझड झालेल्या बुरुजांची जतन व दुरुस्ती करण्याबाबत जिल्हाधिकारी पालघर यांना कळविण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**नाशिक येथे दादासाहेब फाळके चित्रपटसृष्टी निर्माण करण्याबाबत**

**(४०) * ३४८८ श्री.जयवंतराव जाधव, श्री.अनिल भोसले, श्री.किरण पावसकर : तारांकित प्रश्न क्रमांक १६८३ ला दिनांक ९ डिसेंबर, २०१४ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोरेगावच्या धर्तीवर नाशिक येथे दादासाहेब फाळके चित्रपटसृष्टी निर्माण करण्यासाठी नाशिक जिल्हाधिकारी कार्यालयाने दिनांक ५ नोव्हेंबर, २०१४ रोजी महाराष्ट्र चित्रपट रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळास जागेच्या माहितीसह सविस्तर प्रस्ताव सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर चित्रपटसृष्टीच्या भुसंपादनासाठी शासनाने दिनांक २७ ऑगस्ट, २००९ रोजी रु.१० कोटी निधी मंजूर केलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या चित्रपटसृष्टीसाठी जमीनीचे संपादन करुन सदर चित्रपटनगरीचा प्रस्ताव मंजूरीसाठी शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीही कार्यवाही केलेली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) जिल्हाधिकाऱ्यांनी जागेशी संबंधित कागदपत्रे महामंडळाला पाठविली आहेत.

(२) नाशिक विकास कार्यक्रमांतर्गत दिनांक २७ ऑगस्ट, २००९ च्या शासन निर्णयान्वये या प्रयोजनार्थ रु.१० कोटी नियतव्यय निश्चित करण्यात आला.

(३) सदर प्रकल्पासाठी नाशिक येथील मुंढेगाव,ता.इगतपुरी येथील संबंधित जागा सांस्कृतिक कार्य विभागाच्या नावे हस्तांतरीत करण्याची विनंती महसूल व वन विभागाला करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पुणे जिल्ह्यात शैक्षणिक संस्थांपासून १०० मीटर परिसरात तंबाखूजन्य पदार्थांवर विक्री करण्यास बंदी घालण्याबाबत**

**(४१) * ५०९१ श्री.अनिल भोसले, श्री.जयवंतराव जाधव, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यात तंबाखू नियंत्रण कायदा २००३ नुसार शैक्षणिक संस्थांपासून १०० मीटर परिसरात तंबाखूजन्य पदार्थ विक्री करण्यास बंदी असूनही याच्या अंमलबजावणीकडे शासनाकडून दुर्लक्ष होत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासन तंबाखू व तंबाखू जन्य पदार्थांवर बंदी आणण्याबाबत विचाराधीन आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे व त्याचे स्वरुप काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) नाही.

(२) व (३) शासनाच्या दिनांक २२/०१/२०११ च्या परिपत्रकान्वये शाळांच्या १०० मीटर परिसरात तंबाखूजन्य पदार्थ विक्रीस बंदी घालण्यात आली आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या निकालानुसार तंबाखू नियंत्रण कायदा, २००३ मधील कलम ६ ची अंमलबजावणी करण्याबाबत शासनाच्या दिनांक २२/०४/२०१४ च्या पत्रान्वये सर्व संबंधितांना सूचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच शासनाच्या दिनांक ०७/०३/२०१५ च्या परिपत्रकान्वये शैक्षणिक संस्थेच्या १०० यार्ड परिसरात तंबाखु व तंबाखुजन्य पदार्थ विकण्यास बंदी असून याचे उल्लंघन करणाऱ्यावर कायद्यानुसार रु.२००/- पर्यंत दंड आकारण्यात येणार आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पेण (जि.रायगड) तालुक्यातील पाणी टंचाईग्रस्त गावांसाठी योजना मंजूर करणेबाबत**

**(४२) * ४५२९ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पेण (जि.रायगड) तालुक्यातील ५१ गावे व १०६ वाडयांना पिण्याचे पाणी पुरवठा करण्यासाठी २५ टँकरची मागणी करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पेण तालुक्यातील हेटवणे या धरणातून टंचाईग्रस्त गावांना पिण्याचे पाणी पुरवठा करण्याच्यादृष्टीने आंदोलन करण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाकडे मागणी केलेल्या प्रस्तावांना तातडीने मान्यता देऊन त्यासाठी आवश्यक निधी शासन उपलब्ध करणार आहे काय ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) हे खरे नाही. मात्र, पेण तालुक्यातील १२ गावे व १६ वाडयांकरिता दिनांक २.२.२०१५ पासून ८ टँकरद्वारे पाणी पुरवठा सुरु करण्यात आलेला आहे.

(२) व (३) होय, हे खरे आहे.

शहापाडा प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजनेचा उद्भव शहापाडा धरण आहे. या धरणातील पाणी फेब्रुवारी-मार्च दरम्यान संपत असल्याने पाणी पुरवठा अपुरा प्रमाणात होतो. सदर योजनेत समाविष्ट असलेली गावे/वाडया ह्या खारेपाट भागातील असल्यामुळे तेथे अन्य पाण्याची साधने उपलब्ध नाहीत.

त्याकरिता खारेपाट भागातील पाणी टंचाई कायमस्वरुपी दूर करण्यासाठी हेटवणे धरणापासून शहापाडा धरणापर्यंत थेट पाईपलाईन टाकण्याबाबत आंदोलन करण्यात आले होते. तथापि, राष्ट्रीय/ग्रामिण पेयजल कार्यक्रमाच्या मार्गदर्शक तत्वानुसार सर्व ग्रामपंचायतींनी ठराव करुन या योजनेची मागणी करणे आवश्यक आहे. अशी मागणी प्राप्त झालेली नाही.

संभाव्य पाणी टंचाई कृती आराखड्यामध्ये पेण तालुक्यातील एकूण २३१ गावे/वाडयामध्ये रु.१०१.१५ लक्ष खर्चाच्या उपाययोजना प्रस्तावित करण्यात आल्या आहेत. सदर उपाययोजनांसाठी शासनाकडे निधीची मागणी प्राप्त झाल्यानंतर निधी उपलब्ध करुन देण्यात येईल.

-----------------

**शासनाकडून ई.बी.सी.शिष्यवृत्ती न मिळाल्याने संस्थाचालक फी साठी तागदा लावत असल्याबाबत**

**(४३) * ३९४९ श्री.सतिश चव्हाण, श्री.हेमंत टकले, डॉ.सुधीर तांबे, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.अनिल भोसले, श्री.प्रकाश गजभिये, श्री.विक्रम काळे, श्री.ख्वाजा बेग, श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील खाजगी, व्यावसायिक अभ्यास (इंजिनियरिंग, पॉलिटेक्नीक, एम.बी.ए, फॉर्मसी व आर्कीटेक्ट) शिक्षण घेणाऱ्या खुल्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांची सन २०१३-१४ व सन २०१४-१५ या वर्षाची ई.बी.सी. शिष्यवृत्तीचे अद्याप वाटप केले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाकडून ई.बी.सी. शिष्यवृत्ती न मिळाल्याने संस्थाचालक फी साठी तागदा लावत असल्याने विद्यार्थ्यांमध्ये तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर ई.बी.सी. शिष्यवृत्तीची रक्कम तातडीने देणेबाबत कोणती कार्यवाही केली आहे,

(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय.

(२), (३) व (४) सन २०१३-१४ मधील थकीत ई.बी.सी. शिष्यवृत्ती प्रदान करण्याची कार्यवाही सुरू आहे.

-----------------

**राज्यातील ग्रामीण भागातील सुमारे ५६ लाख कुटुंबांकडे शौचालये नसल्याबाबत**

**(४४) * ३५४९ ॲड.निरंजन डावखरे, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ४ विभागातील सुमारे १७ जिल्ह्यांमधील पाणीपुरवठा योजना व स्वच्छतेची पाहणी मा.पाणीपुरवठा मंत्री महोदयांनी केली असल्याचे दिनांक १२ जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पाहणीमध्ये राज्याच्या ग्रामीण भागातील सुमारे ५६ लाख कुटुंबियांकडे शौचालयाची सुविधा नसल्याचे तसेच ८ लाख शौचालये केवळ कागदावरच दर्शविण्यात आल्याचेही त्याचवेळी निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ग्रामीण भागातील कुटुंबियांना शौचालये सुविधेसाठी ४ हजारांचा निधी वाढवून १२ हजारांवर अनुदान उपलब्ध करुन देण्याबाबत तसेच कागदोपत्री शौचालये दर्शवून शासन अनुदानाचा गैरप्रकार केल्याबाबत संबंधितांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, कारवाईचे स्वरुप काय व नसल्यास त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) अंशत: हे खरे आहे.

राज्यातील औरंगाबाद व नाशिक या दोन विभागातील अनुक्रमे परभणी व अहमदनगर जिल्ह्यात मा.मंत्री महोदयांनी पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या आढावा बैठका घेतल्या होत्या.

(२) अंशतः खरे आहे.

पायाभूत सर्वेक्षण सन २०१२ नुसार राज्यात ६५,१५,७१८ कुटुंबाकडे शौचालय नसल्याचे निदर्शनास आले होते. सर्वेक्षणानंतर सन २०१३-१४ मध्ये ५,५९,०४२ व सन २०१४-१५ मध्ये २,६४,७१६ अशी एकूण ८,२३,७५८ इतकी शौचालये प्रत्यक्षात बांधण्यात आली आहेत. याबाबत केंद्र शासनाच्या WWW.mdws.gov.in या वेबसाईटवर माहिती उपलब्ध आहे.

(३) व (४) स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) अंतर्गत शौचालय बांधकामासाठीचे प्रोत्साहनपर अनुदान रु.१२.०००/- इतके करण्यात आले असून, उर्वरित ५६,९१,९६० कुटुंबांना शौचालय उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने सन २०१९ पर्यंतचा प्रकल्प अंमलबजावणी आराखडा तयार करण्यात आला आहे. शासन अनुदानाबाबत कोणताही गैरप्रकार झाल्याचे आढळून आले नाही. त्यामुळे संबंधितांवर कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील माध्यमिक शाळांमधील अर्धवेळ ग्रंथपालांना पूर्णवेळ करण्याबाबत

**(४५) * २७६८ श्री.नागो गाणार, श्री.अनिल सोले, श्री.रामनाथ मोते :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन १९८० ते २०१४ पर्यंत राज्यातील माध्यमिक शाळांमध्ये कार्यरत अर्धवेळ ग्रंथपालांची संख्या किती आहे,

(२) या ग्रंथपालांना मागील २४ वर्षापासूनही अर्धवेतनावर काम करावे लागत असल्याने या ग्रंथपालांना पूर्णवेळ ग्रंथपालांचा दर्जा देण्याबाबत ग्रंथपाल संघटनेतर्फे व नागपूर विभागाच्या जनप्रतिनिधींनी दिनांक १२ डिसेंबर, २०१४ व दिनांक २१ डिसेंबर, २०१४ रोजी शासनास पत्र देऊन मागणी केली, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाची भूमिका काय आहे ?

**श्री. विनोद तावडे :** (१) राज्यात एकूण १०६७ अर्धवेळ ग्रंथपाल आहेत.

(२) व (३) १००० पेक्षा कमी विद्यार्थी संख्या असलेल्या शाळांतील अर्धवेळ ग्रंथपालांना पुरेसा कार्यभार नसल्याने पूर्णवेळ पदात रुपांतरीत करण्यात येऊ नये असा शासनाने निर्णय घेतला आहे.

-----------------

## अक्कलकोट (जि.सोलापूर) तालुक्यातील शिक्षकाची पदे भरण्याबाबत

**(४६) * ४२९३ श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्री.हरिसिंग राठोड, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.आनंदराव पाटील, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अक्कलकोट (जि.सोलापूर) तालुक्यातील पंचायत समिती शिक्षण विभागाच्या पटसंख्येनुसार निश्चित शासनस्तरावरुन शिक्षकांची १,२३८ पदे मान्य असतानाही १०० पदे रिक्त असल्याचे माहे जानेवारी २०१५ मध्ये वा त्यादरम्यान आढळून आले हे, खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून रिक्त असलेली शिक्षकांची १०० पदे तातडीने भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) अंशत: खरे आहे.

(२), (३) व (४) शिक्षकांच्या व मुख्याध्यापकांच्या सेवानिवृत्ती, आंतरजिल्हा बदली व पदोन्नतीमुळे सदर पदे रिक्त झाली आहेत. रिक्त पदे पदोन्नतीने, समायोजनाने व आंतरजिल्हा बदलीने भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

-----------------

**राज्यात सार्वजनिक ठिकाणी महिलांसाठी पुरेशी स्वच्छतागृह उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(४७) * ४२५० श्री.शरद रणपिसे, श्री.हरिसिंग राठोड, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.सुधीर तांबे, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सार्वजनिक ठिकाणे, लांब पल्ल्याचे रस्ते, महामार्ग रेल्वे, एस.टी स्थानके इत्यादी ठिकाणी महिलांसाठी पुरेशी स्वतंत्र व सोयी सुविधायुक्त अशी स्वच्छता गृहे नसल्यामुळे महिलांची अतिशय गैरसोय होत असून दूरच्या प्रवासाच्यावेळी या सुविधेअभावी त्यांच्या आरोग्यावरही परिणाम होत असतो ही बाब दिर्घ काळापासून शासनाच्या निदर्शनास आलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यावर कोणत्या उपाययोजना करण्यात आल्या आहेत व त्या पूर्णत्वास केव्हापर्यंत येणार आहेत,

(३) याबाबत अद्याप उपाययोजना करण्यात आल्या नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत व याबाबत केव्हा पर्यंत कार्यवाही करण्यात येणार आहे ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) होय, अंशत: खरे आहे.

(२) राज्यातील सार्वजनिक ठिकाणी, लांब पल्याचे रस्ते, महामार्ग रेल्वे, एस.टी.स्थानके, शासकीय-निम शासकीय कार्यालये इत्यादी ठिकाणी महिला व पुरुषांकरिता स्वतंत्र शौचालये बांधण्याबाबत शासन स्तरावरुन सर्व प्रशासकीय विभागांना तसेच त्यांच्या अधिनस्त असलेल्या सर्व कार्यालयांना सूचना देण्यात आलेल्या आहेत.

तसेच उघडयावर शौच केल्याने निर्माण होणाऱ्या पर्यावरणीय व सुरक्षिततेच्या समस्याबद्दल जनतेमध्ये जागरुकता निर्माण करुन शौचालयाची गरज व त्याचा वापर याबद्दल मानसिकता तयार करण्यावर स्वच्छ भारत मिशन अंतर्गत भर देण्यात आला आहे.

केंद्र शासनाच्या निर्देशानुसार महात्मा गांधी यांच्या १५० च्या जयंतीचे औचित्य साधून दि. २ ऑक्टोबर, २०१९ पर्यंत संपूर्ण महाराष्ट्र हागणदारी मुक्त करण्याचे शासनाचे धोरण आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**हिंदी विद्‌यापीठ मुंबई, माहिम या संस्थेने सन दहावीची परिक्षा न घेता दहावी पासची बोगस प्रमाणपत्रे दिल्याबाबत**

**(४८) * ६१४० प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंदी विद्‌यापीठ मुंबई, माहिम १६ या संस्थेने सन २००८ पासून दहावीची परिक्षा न घेता दहावी पासची बोगस प्रमाणपत्रे देण्यात आल्याचे बाब जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरची प्रमाणपत्रे ठाणे येथील एकात्मिक बालविकास प्रकल्प १ (ICDS) व सद्‌या प्रकल्प २ येथे कार्यरत असणाऱ्या पर्यवेक्षीकाने अनेक लोकांकडून प्रत्येकी ५०,००० रुपये घेऊन दिली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार दोषी व्यक्तीविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही. याबाबत शालेय शिक्षण विभागाकडे कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही.

(२) याबाबत महिला व बालविकास विभागाने चौकशी केली असता तथ्य आढळून आले नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**बीड जिल्हा परिषद वसतिशाळेत शिक्षकांची नियुक्ती करण्याबाबत**

**(४९) * ५५६९ श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या आराखडयानुसार मंजुर झालेल्या बीड जिल्हा परिषद वसतीशाळा शिक्षकांपैकी फक्त ४४२ जणांची नियुक्ती करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिक्षण आयुक्तांकडून मंजूर पदांना संच मान्यता मिळाली नसल्याने उर्वरित ४५० शिक्षकांवर उपासमारीची वेळ आलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उर्वरित शिक्षकांना नियुक्ती देण्यासंदर्भात तसेच उर्वरित शिक्षकांच्या संच मान्यते संदर्भात शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने निर्णय घेतलेला आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय हे खरे आहे.
(२), (३), (४) व (५) बृहत आराखड्यानुसार बीड जिल्हा परिषदेच्या सुरु झालेल्या २२१ नवीन प्राथमिक शाळा व ३७ उच्च प्राथमिक शाळांतील विद्यार्थी संख्येवर आधारीत ७८४ वाढीव पदमान्यतेचा प्रस्ताव संचालाकांकडून शासनास प्राप्त झाल्यावर अनुषंगिक कार्यवाही करण्यात येईल.

-----------------

**टिटवाळयातील (जि.ठाणे) वावेघर येथील पाण्याची समस्या सोडविण्याबाबत**

**(५०) * ५७२१ श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) टिटवाळयातील (जि.ठाणे) वावेघर गावातील ग्रामस्थांना पाण्यासाठी वणवण करावी लागत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पाण्याची समस्या सोडविण्यासाठी ग्रामपंचायत दुर्लक्ष करते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, टिटवाळयातील वावेघर गावातील पाण्याची समस्या सोडविण्यासाठी कोणती उपाययोजना करण्यात आली वा येत आहे,
(४) अद्याप, उक्त प्रश्नाबाबत कोणतीच उपाययोजना करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) हे खरे नाही.
तथापि, वावेघर ही योजना स्वतंत्र नळ पाणी पुरवठा योजना ग्रामपंचायतीकडे हस्तांतरीत असून, ग्रामपंचायती मार्फत चालविण्यात येते. ग्रामपंचायतीने योजनेचे विद्युत देयक अदा न केल्यामुळे विज वितरण कंपनी यांनी देयका अभावि विद्युत पुरवठा खंडीत केल्यामुळे पाणी पुरवठा योजना बंद आहे. सदर गावात १५ खाजगी विंधन विहिरी, २ शासकीय विहिरी व २ शासकीय विंधन विहिरी अशी पाणी पुरवठ्याची साधने आहेत. ग्रामपंचायती मार्फत विद्युत जोडणी पुर्ववत करण्यासाठी प्रयत्न सुरु असून वसुली करुन योजना पुर्ववत करण्याची कार्यवाही ग्रामपंचायती तर्फे सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**लातूर विभागातील जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण कार्यालय अंतर्गत ३० कर्मचाऱ्यांची वैद्यकीय देयके कालबाहय झाल्याबाबत**

**(५१) * ६३०६ श्री.अमरसिंह पंडित, श्री.धनंजय मुंडे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण कार्यालय, लातूर येथील ३० अशासकीय कर्मचाऱ्यांची वैद्यकीय देयके ३ वर्षांपासून मंजुरीस्तव दाखल केलेली असताना रक्कम मिळणेपूर्वीच ही देयके कालबाह्य झाली आहेत, हे खरे आहे काय,

(२) अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकातील अनुदानाच्या मंजुरी अभावी सदरची देयके कालबाह्य झाली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, हजारो अशासकीय कर्मचाऱ्यांची वैद्यकीय प्रतिपूर्ती देयके मंत्रालय आणि संचालनालय स्तरावर वर्षानुवर्षे राहत आहेत, याबाबत शासन कोणती उपाययोजना करणार आहे,

(४) वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीसाठी स्मार्ट कार्डसारखी नवीन योजना शासन आणणार आहे काय, त्याची अंमलबजावणी केव्हापर्यंत होणे अपेक्षित आहे,

(५) उक्त ३० कर्मचाऱ्यांची देयके अदा करण्यासाठी शासन कोणती कार्यवाही करणार आहे ?

**श्री. विनोद तावडे :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही, शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र.व्यशिम-२०१४ (३७/१४)/व्यशि-१ दिनांक १५ मे, २०१४ अन्वये सहसंचालक, प्रादेशिक कार्यालय यांना विभाग प्रमुख म्हणून घोषित केलेले आहे. त्यामुळे अशासकीय कर्मचा-यांची वैद्यकीय प्रतिपूर्तीची देयके संचालक व विभागीय सहसंचालक यांच्या स्तरावरुन मान्य करण्यात येत आहे.

(४) स्मार्ट कार्डसारखी नवीन योजना सुरू करणेबाबत शासनाच्या सध्या विचाराधीन नाही.

(५) प्राप्त वैद्यकीय देयकांची पडताळणी करुन मंजूर करण्याची कार्यवाही संचालनालय व विभागीय सहसंचालक प्रादेशिक कार्यालय स्तरावर सुरू आहे.

-----------------

**राज्यातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना पगार देण्याबाबत**

**(५२) * २८९० डॉ.सुधीर तांबे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.नरेंद्र पाटील, श्री.सुनिल तटकरे, श्री.धनंजय मुंडे, श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित, श्री.अनिल भोसले, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या पगाराची वर्षभरासाठी केलेली तरतूद चार महिन्यापूर्वी संपल्याने व उर्वरित पगारासाठी आर्थिक तरतूद करण्यात आली नसल्यामुळे शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांना चार महिन्यांपासून पगार मिळाला नसल्याचे माहे जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास उघडकीस आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांना त्वरीत पगार देण्याबाबत तसेच पगाराची चुकीची आर्थिक तरतूद करणाऱ्या दोषी अधिकाऱ्यावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील प्राध्यापकांना सहाव्या वेतन आयोगाची थकबाकीची रक्कम अदा करण्याबाबत**

**(५३) * ३७६७ श्री.विक्रम काळे, श्री.हेमंत टकले, श्री.प्रकाश गजभिये, डॉ.सुधीर तांबे, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.अमरसिंह पंडित, श्री.ख्वाजा बेग, श्री.सतिश चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी : तारांकित प्रश्न क्रमांक १७०६ ला दिनांक १६ डिसेंबर, २०१४ रोजी दिलेल्या उत्तराच्या सदंर्भात:** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील दिनांक १ जानेवारी, २००६ नंतर सेवेत आलेल्या विद्यापिठ आणि महाविद्यालयीन प्राध्यापकांना सहाव्या वेतन आयोगाची थकबाकीची रक्कम अदा करण्याबाबत शासनाची कार्यवाही पूर्ण झाली आहे काय,

(२) असल्यास, शासनाने घेतलेल्या निर्णयाचे स्वरुप काय आहे,

(३) उपरोक्त प्रकरणी अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, होणाऱ्या विलंबाची सविस्तर कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय.

(२) दि. १२.८.२००९ नुसार राज्यात सहाव्या वेतन आयोगाच्या तरतूदी अध्यापकांना लागू केल्या आहेत. सहाव्या वेतन आयोगानुसार दि.१-१-२००६ नंतर नियुक्त झालेल्या अध्यापकांच्या दि. १-१-२००६ ते ३१-०३-२०१० या कालावधीतील देय फरकांची रक्कम अदा करण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व अतिविशेषोपचार रुग्णालय, नागपूर येथे रुग्णांच्या नातेवाईकांसाठी प्रतिक्षालय व शौचालयाची व्यवस्था करण्याबाबत**

**(५४) * २६९४ श्री.अनिल सोले, श्री.नागो गाणार, श्री.मितेश भांगडिया :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व अतिविशेषोपचार रुग्णालय, नागपूर येथे रुग्णांच्या नातेवाईकांना थांबविण्यासाठी प्रतिक्षालय व शौचालयाची व्यवस्था करण्यात येणार आहे काय,

(२) असल्यास, शासन स्तरावर याबाबत कोणती कार्यवाही करण्यात येत आहे,

(३) कार्यवाही करण्यात आली नसल्यास, त्याची कारणे काय,

(४) याकरिता खाजगी संस्था किंवा दानशुर व्यक्तींची मदत घेण्याबाबत काही योजना प्रस्तावित आहे काय ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय.

(२) उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग नागपूर, यांचेकडून याबाबतचे अंदाजपत्रक व नकाशे मागविण्याची कार्यावाही संस्थास्तरावर सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) खाजगी संस्था किंवा दानशुर व्यक्तींकडून याबाबत काही प्रस्ताव प्राप्त झाल्यास प्रचलित नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल.

-----------------

**+ २ स्तरावरील व्यवसाय अभ्यासक्रम शिकविणा-या पुर्णवेळ शिक्षकांना प्रथम नियुक्तीच्या दिनांकापासून वरिष्ठ वेतनश्रेणीचा लाभ मिळण्याबाबत**

**(५५) * ५२७१ डॉ.अपूर्व हिरे : तारांकित प्रश्न क्रमांक ५००९८ ला दिनांक १२जून, २०१४ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) + २ व्यवसाय अभ्यासक्रम शिकविणा-या पुर्णवेळ शिक्षकांना उच्च माध्यमिक स्तरावरील नेमणुकीच्या दिनांकापासून वरिष्ठ वेतनश्रेणीचा लाभ मिळणेसंदर्भातील दिनांक १ ऑक्टोबर, १९८० चा शासन निर्णय उपलब्ध झाला आहे काय,

(२) असल्यास, संबंधित शिक्षकांना उच्च माध्यमिक स्तरावरील नेमणुकीच्या दिनांकापासून त्याची १२ वर्षाची अर्हता प्राप्त सेवा विचारात घेऊन त्यांना वरिष्ठ वेतनश्रेणीचा लाभ देणेप्रकरणी पुढे कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, याप्रश्नी होत असलेल्या विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) अंशतः खरे आहे.

दिनांक १ ऑक्टोबर १९८० चा शासन निर्णय नसून दि.११ जून १९८० चा शासन निर्णय हे तत्कालीन संचालक, तंत्रशिक्षण यांनी व्यवसाय अभ्यासक्रम राबविण्या-या सर्व संस्थांना पृष्ठांकीत करुन पाठविलेले पत्र आहे. सदर पत्रान्वये कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक एका कॉलेजमधून दुस-या कॉलेजमध्ये रुजू झाल्यानंतर त्यांच्या वेतन निश्चितीबाबतचा शासन निर्णय आहे.

(२) ११ जून १९८० चा शासन निर्णय व दि.१ ऑक्टोबर, १९८० चे पृष्ठांकन पत्र हे वरीष्ठ वेतन श्रेणी संबंधित नसून शिक्षक एका कनिष्ठ महाविद्यालयातून दुस-या कनिष्ठ महाविद्यालयात रुजू झाल्यास वेतन निश्चिती करण्यासंदर्भात आहे. तथापि +स्तरावरील व्यवसाय अभ्यासक्रम शिकविणा-या पूर्णवेळ शिक्षकांना दि.२५ मार्च, १९९४ च्या शासन निर्णयान्वे दि.१६ ऑक्टोबर, १९९२ पासून व्दीस्तरीय वेतनश्रेणी लागू करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**कांदिवली येथील बालक विहार विद्यालय (माध्यमिक) या शाळेत अतिरिक्त शिक्षक बोगस दाखविल्याबाबत**

**(५६) * ३३८२ श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कांदिवली येथील बालक विहार विद्यालय (माध्यमिक) या शाळेत अतिरिक्त शिक्षक बोगस दाखविले असल्याचे चौकशीत आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संबंधात वस्तुस्थिती काय आहे,

(३) या प्रकरणात संबंधित मुख्याध्यापक आणि शिक्षण निरीक्षक कार्यालयातील कर्मचाऱ्यांवर काय कार्यवाही केली आहे ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय.

(२) व (३) बालक विहार विद्यालय (माध्यमिक) या शाळेतील ४ अतिरिक्त शिक्षक बोगस असल्याची बाब निदर्शनास आल्यानंतर सदर ४ शिक्षकांचे समायोजनाचे आदेश रद्द करण्यात आले आहेत.

सदर अनियमिततेसंदर्भात संस्थेने प्रभारी मुख्याध्यापकास निलंबित केले आहे व तत्कालीन प्रभारी शिक्षण निरीक्षक यांना निलंबित करण्यात आले आहे. तसेच विभागीय शिक्षण उपसंचालक, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली त्रिसदस्यीय समिती गठीत करण्यात आली असून पुढील चौकशीची कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

**वसई (जि.पालघर) तालुक्यातील पुरवठा विभागात धान्य पुरवठा आणि केरोसीन वितरणामध्ये झालेला भ्रष्टाचार**

**(५७) * ६०३२ श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.राहुल नार्वेकर :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई (जि.पालघर) तालुक्यात तहसिलदार कार्यालयाच्या पुरवठा विभागाच्या कक्षेत येणा-या शासकीय धान्य पुरवठा, केरोसीन यांच्या वितरणामध्ये मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार होत असल्याची धक्कादायक बाब दिनांक १७ फेब्रुवारी, २०१५ रोजी उघडकीस आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने याची चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्याअनुषंगाने याला जबाबदार असलेल्या संबंधित पुरवठा अधिकारी व परवाना धारकांवर कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,

(४) अद्यापी, कारवाई केली नसल्यास विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) व (२) दि.१६.२.२०१५ रोजी वसई येथील तहसिल कार्यालयात झालेल्या बैठकीमध्ये प्राप्त झालेल्या तक्रारींच्या अनुषंगाने तपासणी करण्यात आली आहे.

(३) व (४) तपासणीचा अहवाल तयार करण्यात आला असून पुढील आदेशार्थ जिल्हाधिकारी, पालघर यांच्याकडे सादर करण्यात येत आहे. त्यावरील जिल्हाधिकारी यांच्या निर्देशांनुसार सकृतदर्शनी दोषी आढळून आलेल्या व्यक्तिंविरुद्ध उचित कारवाई करण्यात येईल.

-----------------

**अंजनेरी (जि.नाशिक) येथे साहसी क्रीडा प्रकारांचे नोडल सेंटर उभारण्याबाबत**

**(५८) * ४७८० श्री.जयवंतराव जाधव, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अनिल भोसले, श्री.हेमंत टकले : तारांकित प्रश्न क्रमांक ११४६ ला दिनांक ९ डिसेंबर, २०१४ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **क्रिडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंजनेरी (जि.नाशिक) येथे साहसी क्रीडा प्रकारांचे नोडल सेंटर उभारण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २ जानेवारी, २०१४ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच अंजनेरी (जि.नाशिक) येथील ट्रेकींग इन्स्टिटयुटचे काम पूर्ण होवूनही सदर इन्स्टिटयुट सुरु करण्यासाठी शासकीय यंत्रणांकडून दिरंगाई केली जात असल्याचे माहे जानेवारी, २०१५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) बाबत शासनामार्फत कोणती कार्यवाही करण्यात आली,

(४) अद्याप कोणतीही कार्यवाही केलेली नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) नाही. सदर ट्रेकिंग इन्स्टिट्युचे बांधकाम सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत सुरु आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पुणे जिल्ह्यातील बोर्डाच्या शाळांमध्ये इतर विषय शिकविण्यात येत असल्याबाबत**

**(५९) * ५९६५ श्री.अनिल भोसले, श्री.धनंजय मुंडे, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.जयवंतराव जाधव :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील बोर्डाच्या शाळांमध्ये इयत्ता ८ ते ११ वी साठी राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची परवानगी न घेता इतर विषय शिकविण्यात येत असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान दुसऱ्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार इतर विषय शिकविल्याने विद्यार्थ्यांचे होत असलेले शैक्षणिक नुकसान टाळणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) नाही.

(२), (३), व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**निवासी डॉक्टरांचे मागील दोन महिन्याचे विद्यावेतन प्रलंबित असल्याबाबत**

**(६०) * ५९७८ श्री.सतिश चव्हाण, डॉ.सुधीर तांबे, श्री.विक्रम काळे, श्री.धनंजय मुंडे :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील १४ शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयात कार्यरत असलेल्या निवासी डॉक्टरांना मागील दोन महिन्यांपासून विद्यावेतन न मिळाल्याने मार्डने माहे जानेवारी, २०१५ च्या पहिल्या आठवडयात संपाची नोटीस दिली, हे खरे आहे काय

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास,चौकशीच्या अनुषंगाने सदर निवासी डॉक्टरांना प्रतिमहा विद्यावेतन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही. तथापि, निवासी डॉक्टरांचे विद्यावेतन देण्याकरीता अनुदानाची कमतरता भासत असल्याने विद्यावेतन देण्याबाबतचा प्रश्न सदर कालावधीत निर्माण झाला होता.
(२) व (३) निवासी डॉक्टरांचे विद्यावेतन अदा करण्यासाठी अनुदानाची कमतरता भासल्यास सदरचा खर्च संबंधित महाविद्यालयाच्या स्वीय प्रपंची खात्यातूनन विशेष बाब म्हणून भागविण्याबाबत सर्व अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय यांना सूचना देण्यात आल्या आहेत. त्यानुषंगाने सद्यस्थितीत सर्व निवासी डॉक्टरांना विद्यावेतन विहीत कालावधीत अदा करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**ग्रामीण भागातील पाणीटंचाई दूर करण्यासाठी करावयाची उपाययोजना**

**(६१) * ३५५० अॅड.निरंजन डावखरे, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.संजय दत्त, डॉ.सुधीर तांबे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.अनिल भोसले, श्री.सुनिल तटकरे, श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.ख्वाजा बेग, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.हेमंत टकले, श्री.प्रकाश गजभिये, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.सतिश चव्हाण, श्री.शरद रणपिसे, श्री.हरिसिंग राठोड, श्री.रामहरी रुपनवर, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.संदिप बाजोरिया, डॉ.नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील ग्रामीण भागातील पाणी टंचाई दूर करण्यासाठी सन २०१४-२०१५ या आर्थिक वर्षासाठी केंद्र सरकारने १०० कोटी ३५ लाख आणि राज्य शासनाने २८ कोटी असा एकूण १२८ कोटी ३५ लाख माहे जानेवारी, २०१५ च्या पहिल्या आठवडयात वितरीत केला असून दरवर्षी शेकडो कोटीचा निधी देऊनही राज्यातील ३४ जिल्ह्यातील १,००,४८८ यापैकी हजारो वाडया-वस्त्या पाण्यापासून वंचित आहेत हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ग्रामीण भागातील पाणीटंचाई दूर करण्यासाठी सन २०१४-२०१५ साठी उद्दीष्ट दिलेल्या २२५४ दलित वस्त्यापैकी अवघ्या १७ ठिकाणी ही योजना पोहोचली तर भटक्या विमुक्तीच्या १७५०५ पैकी २६७, अल्पसंख्याकांच्या ८,३४८ पैकी १६२ आणि अल्प उत्पन्न गटातील ३७५७ पैकी इंडिया वॉटरच्या आकडेवारीतून निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच केंद्र शासनाने पाण्याचे नमुने तपासणी संदर्भात १७ प्रयोगशाळा बांधण्याचे उद्दीष्ट दिले असताना अद्याप एकही प्रयोगशाळा बांधण्यात आली नसल्याचेही दिनांक १८ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय
(५) असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाने जानेवारी २०१५ मध्ये केंद्र हिश्यापोटी रु. १०० कोटी ३५ लाख (रुपये शंभर कोटी पस्तीस लाख) व राज्य हिश्यापोटी रु. २८.०० कोटी (रुपये अठ्ठावीस कोटी) असा एकूण रु. १२८.३५ कोटी (रुपये एकशे अठ्ठावीस कोटी पस्तीस लाख) एवढा निधी संबंधीत अंमलबजावणी यंत्रणांना वितरीत केला आहे.

राज्यामध्ये दि. ०१/०४/२०१४ नुसार असलेल्या एकूण १,००,४८८ वस्त्यांपैकी ८७,३२६ वस्त्यांना शासन निकषानुसार पाणी पुरवठा उपलब्ध करण्यात आला आहे. उर्वरित १३,१६२ वस्त्या अंशत: हाताळण्यात आल्या आहेत.
(२) नाही.
(३) नाही.

केंद्र शासनाने दिलेल्या १८ प्रयोगशाळा बांधण्याच्या उदिष्टापैकी १७ प्रयोगशाळा स्थापन करण्यासाठी आवश्यक निधी भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा, पुणे व राज्य आरोग्य प्रयोगशाळा, पुणे यांना व राज्य आरोग्य प्रयोगशाळा, पुणे यांना वितरित करण्यात आला असून प्रयोगशाळा स्थापनेबाबतचे काम प्रगतीपथावर आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**शालेय विद्यार्थ्यांच्या दप्तराचे ओझे कमी करण्याबाबत**

**(६२) * ५५७८ श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शालेय विद्यार्थ्यांच्या दप्तराचे ओझे कमी करण्याच्या दृष्टीने टॅब द्वारे शिक्षण देण्याची योजना प्रस्तावित असल्याची बाब जानेवारी-फेब्रुवारी, २०१५ च्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, टॅब अभ्यासक्रमाची योजना फक्त आठवी ते दहावीतील विद्यार्थ्यांकरीता प्रस्तावित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, दप्तरांचे ओझे हा विषय पहिली ते पाचवीच्या विद्यार्थ्यांशी निगडीत असताना या विद्यार्थ्यांसाठीच या अभ्यासक्रमाची योजना प्रस्तावित आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या योजनेसाठी मध्यान्ह भोजन योजनेमध्ये बदल करण्याचे प्रस्तावित असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) नसल्यास, शासनाची पुढील भुमिका काय आहे ?

**श्री. विनोद तावडे :** (१), (२) व (३) नाही. अशी कोणतीही योजना प्रस्तावित नाही.
(४) सदर, दप्तराचे ओझे कमी करण्यासाठी शालेय पोषण आहार योजनेच्या अंमलबजावणीमध्ये बदल करण्याची कोणतीही बाब विचाराधीन नाही.
(५) शासनाच्या दिनांक २५/११/२०१४ च्या शासन निर्णयानवये दप्तराचे ओझे कमी करण्यासाठी उपययोजना सुचविण्यासाठी समिती गठीत केलेली आहे. या समितीच्या अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

-----------------

**विधान भवन :** **उत्तमसिंग चव्हाण**
**मुंबई.** **सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रकिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.